दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २३६ । मंगळवार ९ जून २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

कशाला घेता ३इन १ व ४ इन १ जेव्हा रु.५० मध्ये मिळतोय
लाभच लाभ शुभलाभ ६ इन १ ६ सुवासिक सुगंधासह
शुभलाभ बेस्ट ६
६ इन १ १२०ग्रॅम
रु. 65 चा रु. 50 मध्ये
तसेच केशर चंदन, इंडियन कस्तुरी
निळकंठ, अगरबत्तीचे विक्रेते


स्टॉ. केवल अगरबत्ती
रसरंग मिसळ समोर आडते बाजार अ.नगर



**'सहजयोग'**
**भाग ७६**

### कुंडलिनी आणि प्रकाश

सर्व प्रथम म्हणजे आपल्या भारत भूमीला योगाचं केवढं मोठं साधन मिळालेलं आहे.परमेश्वर आपल्या हृदयात, मंदिरात बसलेला आहे. तो आपण जाणला पाहिजे. आपल्यामध्ये जो प्रकाश आहे, तो जागृत झाला पाहिजे. आपल्याला हे कळलं पाहिजे की आतमध्ये काय आहे आपल्या आणि बाहेर काय आहे.सहजयोग म्हणजे फार मोठी किमया आहे. तुम्ही काहीही पूर्वजन्मात ह्या जन्मात काहीही पापं केली असतील तरी आमच्या प्रेमापुढे ती तोडकीच आहेत. असं कोणचंही पाप तुम्ही करू शकत नाही, जे आमचं प्रेम धुऊन काढू शकत नाही. ही मात्र गोष्ट निर्विवाद आहे. तेव्हा त्याबद्दल मुळीच विचार करू नये, की आमच्या हातून हे पाप घडलं किंवा ते पाप घडलं. ही फार मोठी सहजयोगाची किमया पहिल्यांदा आहे की तुम्हांला तुमची कर्मभोग वगैरे सहजयोग सांगत नाही.झालं संपलं आता. कर्म तरी तुमचा अहंकारच भोगतोय ना.ज्याला अहंकार नाही तो कसलं कर्म भोगतो हो. प्रकाशाशिवाय नुसत्या लेक्चरबाजीने काहीही कार्य होण्यासारखं नाहीय. तेव्हा तुम्ही ते मिळवा.

आकुर्डी, ११ जानेवरी १९८०
अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# तृणमूलला भगदाड...

## २० खासदार फुटीच्या तयारीत!



### ममतांना आणखी एक धक्का..?

■ सुखेंदू शेखर राय यांच्या राजीनाम्यानंतर बंगालच्या राजकारणात खळबळ; दिल्लीतील गुप्त बैठकीने वाढवली उत्सुकता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात तृणमूल काँग्रेससमोरील संकट अधिकच गडद होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार सुखेंदू शेखर राय यांनी पक्ष आणि राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर आता तृणमूल काँग्रेसचे तब्बल २० लोकसभा खासदार पक्षापासून दूर जाण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे.

राजीनाम्यानंतर राय यांनी काही खासदारांसोबत घेतलेल्या कथित गुप्त बैठकीमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या बैठकीत अनेक प्रभावी खासदार उपस्थित असल्याचा दावा केला जात असून, पक्षातील वाढत्या असंतोषाची ही मोठी झलक मानली जात आहे.

ज्येष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार सुखेंदू शेखर राय यांनी पक्ष आणि आपल्या पदाचा राजीनामा दिला. राजीनामा दिल्यानंतर सुखेंदू यांनी सुमारे २० लोकसभा खासदारांसोबत एक गुप्त बैठक घेतली. या बैठकीचा एक फोटो समोर आला असून, त्यात शर्मिला सरकार, प्रसून बॅनर्जी, कालीपदा सोरेन, जगदीश बसुनिया आणि अरूप चक्रवर्ती दिसत आहेत. तथापि, काही वृत्तांमध्ये असाही दावा करण्यात आला आहे की, हे सर्व खासदार भाजपच्या संपर्कात होते. टीएमसीचे लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खासदार आहेत. अलीकडील घडामोडींनुसार, बंगालमधील ८० आमदारांपैकी ५८ आमदारांनी एक वेगळा गट स्थापन केला आहे.

तृणमूल काँग्रेसकडे सध्या लोकसभेत २८ तर राज्यसभेत १३ सदस्य आहेत. अशा परिस्थितीत २० खासदार फुटल्यास पक्षाच्या संसदीय ताकदीला मोठा धक्का बसू शकतो. यापूर्वीच पक्षातील आमदारांमध्ये अस्वस्थता वाढल्याच्या चर्चा सुरू असताना आता खासदारांबाबतच्या घडामोडींनी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वापुढे नवे आव्हान उभे राहिले आहे. राजीनाम्यानंतर बोलताना सुखेंदू शेखर राय यांनी पक्षातील (पान ४ वर)

### २० खासदार फुटल्यास....

- लोकसभेतील तृणमूलची ताकद मोठ्या प्रमाणात घटणार
- बंगालमधील विरोधी राजकारणाला नवी दिशा
- राष्ट्रीय पातळीवर विरोधी आघाडीच्या समीकरणांवर परिणाम
- ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वासमोर मोठे आव्हान

# इंडिया आघाडी गलितगात्र विरोधकांचे मनोबल खच्ची

## मोदींवर टीका करणाऱ्यांना जनता धडा शिकवेल : उपमुख्यमंत्री हल्लाबोल

**सतीश खर्डे । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** इंडिया आघाडीवर जोरदार हल्लाबोल करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या नेतृत्वावर आणि एकजुटीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

विरोधकांचे मनोबल पूर्णपणे खच्ची झाले असून, इंडिया आघाडी गलितगात्र अवस्थेत पोहोचली आहेत. असा घणाघाती आरोप करत त्यांनी राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसवर अप्रत्यक्षरित्या निशाणा साधला.



विरोधकांकडे विकासाचा अजेंडा नसून, केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करण्याचे राजकारण सुरू असल्याचा दावा करत शिंदे यांनी आगामी काळात मोदींचे नेतृत्व अधिक मजबूत होईल,असा विश्वास व्यक्त केला.

दिल्लीमध्ये देशातील २० राज्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली.या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. देशभरात शिवसेना संघटन वाढविण्याबाबत राज्य प्रमुखांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्ष विस्तारासाठी सकारात्मक वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले.या बैठकीमुळे शिवसेनेला नवी ताकद मिळेल, तसेच कार्यकर्त्यांच्या प्रश्नांना निश्चित न्याय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विरोधी पक्षांना देशाची प्रगती सहन होत नसल्याचा आरोप करत शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश झपाट्याने पुढे जात आहे. मात्र विरोधकांकडे विकासाचा अजेंडा नसल्याने ते सातत्याने मोदींवर टीका करण्याचे काम करत आहेत. देशाची प्रगती आणि जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा त्यांच्या पचनी पडत नसल्याचेही त्यांनी म्हटले आहेत.

काँग्रेसचे राहुल गांधी यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करताना शिंदे म्हणाले की, देशभर बैठका घेतल्या जात असल्या तरी, त्यामागे ठोस दिशा दिसत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील अनेक वर्षे देशाचे नेतृत्व करतील, कारण त्यांना १४० कोटी भारतीयांचा आशीर्वाद आणि विश्वास लाभला आहे. राहुल गांधीनी आधी स्वतः सातत्याने देशात राहून काम करून दाखवावे, त्यानंतरच मोदींवर टीका करावी, असा टोला त्यांनी लगावला.

ज्येष्ठ नेते शरद पवार व ममता बॅनर्जी या नेत्यांनी देखील राहुल गांधी यांच्या नेतृत्वाच्या सातत्याबाबत प्रश्न उपस्थित केले असल्याचे सांगत शिंदे म्हणाले की, देशात असताना आणि देशाबाहेर गेल्यानंतरही पंतप्रधानांची बदनामी करण्याचे (पान ४ वर)

### बैठकाचा सिलसिला सुरू..


नाशिकमधील राजकीय तिढा लवकरच सुटेल, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सांगितले की, गिरीश महाजन यांच्यासह उदय सामंत यांच्या बैठका सुरू आहेत.स्वतःही या विषयावर संपर्कात असल्याचे यावेळी शिंदे यांनी स्पष्ट केले.

# मी कबड्डीचा खेळाडू , बुद्धीबळाचा नाही

## मग मलादेखील हाच नियम लागू करा – छगन भुजबळांनी व्यक्त केली मनातील खदखद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** मी कबड्डीचा खेळाडू आहे. बुद्धीबळाचा नाही. बुद्धीबळ मला जमत नाही. अरे हमने कहां ना हम कबड्डी के प्लेअर है, शतरंज के खिलाडी नही है असे सांगतात राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्या मनातील खदखद व्यक्त केली , मला राज्यसभा आणि लोकसभेला जायचं होतं. चार पाच वेळा संधी आली. दुर्दे वाने संधी मिळाली नाही. यावेळी जायचं आहे. मकरंद पाटील मंत्री आहेत. त्यांचे भाऊ खासदार आहे. सुनेत्रा पवार मंत्री, पुत्र खासदार, तटकरे खासदार पुत्र आमदार. मग मलाही हा नियम लागू करण्याची विनंती आपण केली होती असे भुजबळ म्हणाले.



राष्ट्रवादीकडून राज्यसभेसाठी ज्येष्ठ नेते छगन भुजबळ इच्छुक होते. मात्र, राज्यसभेवर जाण्याकरिता त्यांनी स्वतःचे मंत्रिपद समीर भुजबळ यांना देण्याची अट ठेवली होती . याकरिता दिल्ली भाजपाने रेड सिग्नलदिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून थेट राजेंद्र जैन यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. त्यानंतर छगन भुजबळ नाराज झाले वर कम्युनिकेट करायला वेळ लागला असावा. भाजपकडे प्रपोजल गेलं. जेव्हा मंत्रिमंडळाचं विस्तारीकरण होईल तेव्हा विचार करू. असं कळलं. त्यामुळे भाजपने नकार दिला यात तथ्य नाही.मी नाराज नाही असे भुजबळ म्हणाले . इतरांना जो न्याय दिला. ते मंत्री आहेत, खासदार आहेत. त्यांची मुलंबाळं आमदार आहेत. तोच न्याय मला का नाही असे सांगत मी कबड्डीचा खेळाडू आहे. बुद्धीबळाचा नाही. बुद्धीबळ मला जमत नाही. अरे हमने कहां ना हम कबड्डी के प्लेअर है, शतरंज के खिलाडी नही है. अशी नाराजी भुजबळ यांनी व्यक्त केली जैन यांच्या उमेदवारीबाबत बोलताना २० दिवसांपासून . ऋमला राज्यसभा की लोकसभा असा विचार सुरू होता. ऋमी राज्यसभेवर जातो असे बोललो होतो.. दरम्यान आज राजेंद्र जैन यांनी अर्ज भरला. यावेळी सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ हे उपस्थित होते. छगन भुजबळ यांना बघताच जैन यांनी त्यांना वाकून नमस्कार केला.

# श्रीगोंद्याच्या तरुणाचा साकुर जवळ अपघातात मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा:** साकूर येथे स्कुटी आणि पिकअप वाहनाच्या झालेल्या भीषण अपघातात श्रीगोंदा तालुक्यातील राजापूर (शेळकेवाडी) येथील प्रताप उर्फ सुनील विजय माने (वय अंदाजे ३५ वर्षे ) यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर अपघातग्रस्त वाहन बदलण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा परिसरात सुरू असून पोलिसांनी हा डाव हाणून पाडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रताप माने हे आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी राजापूर शेळकेवाडी येथून नाशिककडे जात होते. साकूर चौफुलीच्या पुढे एका पेट्रोल पंपासमोर त्यांच्या स्कुटीला भरधाव पिकअप वाहनाने जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, प्रताप माने यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले तसेच आई-वडील असा परिवार आहे.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक वैद्यकीय सेवेकडून रुग्णवाहिका घटनास्थळी पाठविण्यात आली. मात्र, तोपर्यंत प्रताप माने यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले होते. (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### काँकरोच जनता पार्टीचा पुण्यातही एल्गार

पुणे : कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी ११ जून रोजी पुण्यात आंदोलन होणार असल्याची घोषणा केली आहे. दिल्लीतील जंतर मंतर येथील आंदोलनानंतर कॉकरोच जनता पक्षाचे हे दुसरे आंदोलन आहे. कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके आणि पक्षाने या आंदोलनाची घोषणा केली. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी असलेल्या पुण्यात कॉकरोच पक्ष शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करेल. हे आंदोलन गुरुवारी (११ जून) दुपारी ४ वाजता पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठासमोर होणार असल्याचेही सांगण्यात आले. या आंदोलनात हजारो विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले होते. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके सहभागी होण्यासाठी अमेरिकेतून भारतात आले. याशिवाय, देशभरातील विद्यार्थी आणि प्रख्यात अभियंता, शिक्षण सुधारक व पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही या आंदोलनात सहभाग घेतला.

## नगर-दौंड रोडवर अपघात; लष्करी जवानाचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नगर दौंड रोडवर खंडाळा (ता. नगर) शिवारात कार्ले वस्ती जवळ ८ जून रोजी पहाटे २ वाजेच्या सुमारास मारुती कार व पिकअप ची समोरासमोर धडक होवून झालेल्या भीषण अपघातात कारमधील लष्करी जवानाचा जागीच मृत्यू झाला. राजू मोहन भालसिंग (वय ४१, रा. सुरेगाव, ता. श्रीगोंदा) असे मयताचे नाव आहे. ही धडक एवढी जबरदस्त होती की मारुती कार व पिकअपचा अक्षरशः चक्काचूर झाला.

या अपघाताची समजलेली माहिती अशी की, मयत भालसिंग हे नगर मधील लष्कराच्या एमआयआरसी मध्ये कार्यरत होते. तर पत्नी व मुलांसह केडगाव येथे वास्तव्यास होते. रविवारी सुट्टी असल्याने ते त्यांच्या मारुती इको कारने (क्र. एमएच १४ डीएक्स ००४७) (पान ४ वर)

# स्वस्त सोन्याचे अमिष दाखवून लुटणारी टोळी जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** स्वस्त दरात सोने देण्याचे अमिष दाखवून फिर्यादीला लुटणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या आंतरजिल्हा दरोडेखोर टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. नांदेड आणि यवतमाळ भागातील या पाच आरोपींच्या मुसक्या आवळत पोलिसांनी त्याच्याकडून तब्बल २६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या घटनेची पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, अविनाश अनिल नलावडे (रा. सणसवाडी, ता. मानगाव, जि. रायगड) यांनी दिलेल्या फिर्यादीत आरोपी राजु मोहिते आणि अक्षय मोहिते यांनी नलावडे यांचा विश्वास संपादन करून त्यांना स्वस्त दरात सोने देण्याचे




आमिष दाखवले. त्यानुसार ४ जून २०२६ रोजी सायंकाळी ७ ते ७:३० च्या दरम्यान नलावडे यांना अहिल्यानगर तालुक्यातील बुरुगाव शिवारातील रेल्वे उड्डाणपुलाजवळ बोलावले. तिथे आरोपींनी फिर्यादी आणि साक्षीदारांना लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांच्याकडील रोख रक्कम आणि सोन्याचे (पान ४ वर)

## नाशिक प्रकरणात 'टीसीएस' मलेशियाचा थेट संबंध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** नशिकमधील टीसीएस कंपनीतल्या हिंदु महिला कर्मचाऱ्यांसोबत सक्तीचे धर्मांतरण, लैंगिक आणि आर्थिक शोषणामागे मलेशिया आणि पाकिस्तानातील आंतरराष्ट्रीय टोळी कार्यरत असून मलेशियातील टीसीएसचा थेट संबंध असल्याचा गौप्यस्फोट शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी आज केला. नाशिक 'टीसीएस' प्रकरणी न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. यावरुन निरुपम यांनी मलेशियात बसलेला फरार आरोपी इस्लामिक धर्मप्रचारक झाकीर नाईक व 'एमआयएम'च्या नेत्यांची चौकशी करण्याची मागणी केली. तसेच पॉश कायद्याची अंमलबजावणी करण्यास हलगर्जीपणा केल्याबद्दल 'टीसीएस'वर कारवाई होणे आवश्यक आहे, असे निरुपम यांनी सांगितले. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते (पान ४ वर)

# महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त करणार

## रेल्वेच्या ६५ पायाभूत सुविधांच्या कामांना महारेल'च्या बैठकीत मान्यता

**राजू झनके । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळा'मार्फत (महारेल) करण्यात येणाऱ्या एकूण १३१ पैकी पहिल्या टप्प्यात ६५ कामांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'महारेल'च्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले

सह्याद्री अतिथिगृहात ही बैठक झाली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आमदार प्रसाद लाड बैठकीस उपस्थित होते. राज्यातील सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील (अंडर पास) रस्त्याची कामे महारेलमार्फत करण्यात येणार आहेत. त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध निर्देश दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्रात एकही रेल्वे मार्गावर फाटक राहता काम नये. रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्रासाठी रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात;




तसेच महानगरांमध्ये रेल्वे मार्गाच्या आजूबाजूला असलेले वाढते शहरीकरण लक्षात घेता अशा भागात गरजेनुसार नागरिकांच्या सुलभ दळणवळणाकरिता पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात यावीत. मान्यता देण्यात आलेल्या ६५ कामांमधील संबंधित रस्त्यांवरील २५ हजार ते १ लाखापर्यंत 'टीव्हीयू' (ट्रेन व्हेईकल युनिट) असलेल्या आणि कमीत कमी भूसंपादन आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत.

वाढते शहरीकरण लक्षात घेता शहरांमधील ८० रेल्वे पायाभूत सुविधांची कामे नियोजित करण्यात आली आहे. या कामांसाठी संबंधित महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन करण्यात यावी. समितीने नियोजित कामाविषयी पडताळणी करावी. त्यानंतर ते काम महारेल हाती घेईल. ही कामे पूर्ण झाल्यास या भागातील नागरिकांना त्यांच्या मागणीआधीच पायाभूत सुविधा मिळतील, असा विश्वासही मुख्यमंत्री (पान ४ वर)

### प्रस्तावित रेल्वे पायाभूत सुविधांची ८० कामे

- मुंबई महानगर क्षेत्र- १७
- पुणे शहर- १५
- नागपूर- १३
- नाशिक- ५
- अमरावती- ५
- सांगली- ४
- छत्रपती संभाजीनगर- ३
- कोल्हापूर- ३
- धुळे- ३
- लातूर- ३
- परभणी- ३
- सोलापूर- २
- जळगाव- २
- अहिल्यानगर- १
- नांदेड - १

# असंतोषाचे राजकारण, विरोधकांची कसोटी आणि नवे समीकरण



देशाच्या राजकारणात काही घडामोडी अशा असतात की त्या तात्काळ सत्तांतर घडवून आणत नाहीत, पण भविष्यातील मोठ्या बदलांची चाहूल देऊन जातात. सध्या राष्ट्रीय पातळीवर घडत असलेल्या तीन घटनांकडे अशाच नजरेने पाहण्याची गरज आहे. एकीकडे केंद्रातील मोदी सरकारला बारा वर्षे पूर्ण होत आहेत, दुसरीकडे विरोधकांची 'इंडिया' आघाडी नव्या परिस्थितीत एकत्र येण्याचा प्रयत्न करत आहे आणि तिसरीकडे कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून सरकारविरोधातील असंतोष रस्त्यावर उतरू लागल्याचे चित्र दिसत आहे. या तीन घडामोडी स्वतंत्र वाटल्या तरी प्रत्यक्षात त्या परस्परांशी जोडलेल्या आहेत.

केंद्रात सलग बारा वर्षे सत्ता टिकवून ठेवणे ही छोटी गोष्ट नाही. भारतीय राजकारणाच्या इतिहासात एवढा प्रदीर्घ काळ सत्ता सांभाळताना अनेक सरकारांना अपयश आले आहे. भाजपने मात्र संघटनशक्ती, नेतृत्व, निवडणूक व्यवस्थापन आणि राजकीय आक्रमकता यांच्या जोरावर आपले वर्चस्व कायम राखले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अपेक्षेपेक्षा कमी यश मिळाल्याने भाजपला धक्का बसला होता, परंतु त्या धक्क्यातून पक्षाने स्वतःला सावरले. त्यामुळे बारा वर्षे पूर्ण झाल्यानंतर सत्तेचा उत्सव साजरा करण्याचा भाजपचा प्रयत्न स्वाभाविक मानावा लागेल.

मात्र सत्तेच्या प्रत्येक दीर्घ प्रवासात एक धोका असतो. तो म्हणजे जनतेमध्ये हळूहळू वाढणारा असंतोष. हा असंतोष सुरुवातीला विखुरलेला असतो. त्याला दिशा नसते. पण जेव्हा त्याला एखादे व्यासपीठ मिळते, तेव्हा तो राजकीय शक्तीत रूपांतरित होऊ शकतो. सध्या कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून अशाच प्रकारचा प्रयोग सुरू झाल्याचे दिसते. दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनाला मिळालेला प्रतिसाद हा केवळ एका नव्या संघटनेचा कार्यक्रम नव्हता; तो लोकांमध्ये असलेल्या नाराजीच्या भावनांचाही संकेत होता.

भारतीय राजकारणाचा इतिहास पाहिला तर सत्ताविरोधी असंतोष अनेकदा नव्या राजकीय प्रयोगांना जन्म देत आला आहे. काँग्रेसविरोधी आंदोलनांमधून जनता पक्ष उभा राहिला. अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून आम आदमी पक्षाचा जन्म झाला. त्यामुळे कोणत्याही नव्या आंदोलनाकडे केवळ क्षणिक घटना म्हणून पाहता येत नाही. प्रश्न असा आहे की, कॉक्रोच जनता पार्टी हा असंतोष संघटित राजकीय शक्तीत बदलू शकेल का? सध्या तरी त्याचे उत्तर स्पष्ट नाही. आंदोलनाची ताकद आणि संघटनात्मक क्षमता या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. लोकांचा प्रतिसाद मिळणे आणि त्याचे मतांमध्ये रूपांतर करणे यात मोठा फरक असतो.




याच ठिकाणी विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीची खरी कसोटी सुरू होते. लोकसभेच्या निवडणुकीनंतर विरोधकांमध्ये निर्माण झालेली निराशा अजून पूर्णपणे दूर झालेली नाही. विविध घटक पक्षांमध्ये मतभेद आहेत. काही राज्यांमध्ये काँग्रेस आणि तिचे मित्रपक्ष एकमेकांविरोधात राजकारण करताना दिसतात. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस स्वतःच्या अस्तित्वाच्या लढाईत गुंतलेली आहे. उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाला स्थानिक राजकारण अधिक महत्त्वाचे वाटते. दक्षिण भारतातही वेगवेगळी समीकरणे आहेत. अशा परिस्थितीत 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व आणि दिशा याबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

तरीही एक वास्तव नाकारता येणार नाही. राष्ट्रीय पातळीवर भाजपला आव्हान देण्याची क्षमता आजही सर्वाधिक प्रमाणात काँग्रेसकडेच आहे. त्यामुळे विरोधी आघाडीतील मतभेद कितीही असले तरी अंतिम निर्णय काँग्रेसच्या भूमिकेभोवती फिरणार आहे. विशेषतः नव्याने उदयास येणाऱ्या आंदोलनांबाबत काँग्रेसने सावध भूमिका घेण्याची गरज आहे. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाकडे सुरुवातीला दुर्लक्ष करण्यात आले आणि त्यातून उभ्या राहिलेल्या आम आदमी पक्षाने काँग्रेसलाच मोठा राजकीय फटका दिला. इतिहासाची पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी काँग्रेसला घ्यावी लागेल.

दुसरीकडे भाजपही या घडामोडींकडे दुर्लक्ष करताना दिसत नाही. जनतेतील संभाव्य असंतोषाची जाणीव पक्षाला आहे. त्यामुळे संघटनात्मक बदल, नव्या नेतृत्वाला संधी आणि प्रादेशिक पातळीवर स्वतंत्र प्रयोग यावर भर दिला जात आहे. भविष्यात विविध राज्यांमध्ये भाजपविरोधी असंतोष निर्माण झाल्यास त्याला तोंड देण्यासाठी पर्यायी रणनीती आखण्याचे संकेत दिसत आहेत.

या सर्व घडामोडींचा सारांश असा की, देशाच्या राजकारणात सध्या मोठा बदल घडत नसला तरी बदलाची प्रक्रिया सुरू झाली आहे. भाजप सत्तेचा उत्सव साजरा करत असताना विरोधक नव्या उर्जेच्या शोधात आहेत. कॉक्रोच जनता पार्टीसारखे नवे प्रयोग लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत. मात्र कोणतीही चळवळ, कोणताही पक्ष किंवा कोणतीही आघाडी केवळ असंतोषाच्या आधारावर दीर्घकाळ टिकू शकत नाही. त्यासाठी स्पष्ट विचार, ठोस कार्यक्रम आणि विश्वासार्ह नेतृत्व आवश्यक असते.

आगामी काळात भाजप, काँग्रेस, 'इंडिया' आघाडी आणि नव्या आंदोलनांची दिशा कोणती असेल, हे अजून निश्चित झालेले नाही. पण भारतीय राजकारण एका नव्या वळणावर उभे आहे, एवढे मात्र निश्चित. या वळणावर कोण जनतेचा विश्वास जिंकतो आणि कोण केवळ घोषणांमध्ये अडकून राहतो, यावर पुढील दशकाचे राजकारण ठरणार आहे.

## गुंजाळवाडीत स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाला भक्तिमय प्रारंभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** अधिकमासाच्या पावन पर्वानिमित्त गुंजाळवाडी येथे सोमवार (दि. ८) पासून सुरू झालेल्या परमपूज्य स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाच्या शुभारंभाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. हजारो भाविकांच्या उपस्थितीत काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने गुंजाळवाडीसह परिसरात भक्ती, श्रद्धा आणि हरिनामाचा गजर घुमला.

संगमनेर बसस्थानक परिसरातील दत्त मंदिरापासून सकाळी साडेदहा वाजता मिरवणुकीस प्रारंभ झाला. महिला भगिनींनी डोक्यावर कलश धारण करून सहभाग नोंदविला, तर वारकरी, भाविक आणि ग्रामस्थांनी टाळ-मृदंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष केला. फुलांनी सजविलेल्या रथात विराजमान स्वामी गगनगिरी महाराजांच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

मार्गावर उभारलेल्या स्वागत कमानी, भगव्या पताका, आकर्षक रांगोळ्या आणि विठ्ठल-विठ्ठलच्या गजराने वातावरण भारावून गेले होते. ढोल-ताशांचा निनाद, फटाक्यांची आतषबाजी आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात जवळपास दोन तास चाललेली ही मिरवणूक सप्ताहस्थळी पोहोचली.

यानंतर वैदिक मंत्रोच्चारात स्वामी गगनगिरी महाराजांच्या मूर्तीची स्थापना व घटस्थापना करण्यात आली. ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ झाला. ह.भ.प. उमेश महाराज दशरथे यांच्या कीर्तनातून भक्तांना अध्यात्म, सदाचार आणि नामस्मरणाचा संदेश देण्यात आला. तसेच हरिपाठाच्या माध्यमातून विठ्ठलनामाचा अखंड जप करण्यात आला.

सायंकाळी रामराव महाराज ढोक यांच्या रामायण कथेने कार्यक्रमाला वेगळी उंची मिळाली. प्रभू श्रीरामांच्या आदर्श चरित्राचे रसाळ विवेचन ऐकताना



भाविक भावविभोर झाले.

यावेळी उद्योजक तथा स्वामी गगनगिरी महाराजांचे भक्त आबासाहेब थोरात यांनी सप्ताह हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून अध्यात्मिक विचारांची पर्वणी असल्याचे सांगितले. समाजमाध्यमांवरील अनावश्यक गोष्टींपेक्षा संतांचे विचार आत्मसात करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. उद्योजक दिलीप शिंदे यांनी स्वामी गगनगिरी महाराजांचे जीवन तप, त्याग आणि लोककल्याणाची प्रेरणा असल्याचे सांगितले.

सप्ताहाच्या प्रारंभामुळे गुंजाळवाडी परिसरात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा दिव्य संगम अनुभवास येत असून पुढील सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांमधून भाविकांना आध्यात्मिक पर्वणी लाभणार आहे.

## बेलपिंपळगाव येथे शेतकऱ्यांच्या वतीने कर्जमाफीच्या जीआरची होळी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** नुकतीच महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्ज माफी योजना २०२६ जाहीर केलेली आहे. या योजनेमध्ये बहुसंख्य शेतकरी कर्जमाफी पासून अटी व शर्ती असल्याने अनेक शेतकरी वंचित राहणार आहेत ही कर्जमाफी सरसकट करावी व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा यासाठी काल सोमवार दि.८ जून रोजी बेलपिंपळगाव ता. नेवासा येथे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन या जीआर ची होळी केली. व फसव्या कर्जमाफीचा निषेध व्यक्त केला.

याप्रसंगी बेलपिंपळगावचे सरपंच किशोर गारुळे नेवासा मार्केट कमिटीचे माजी सभापती वसंतराव रोटे शेतकरी संघटनेचे जिल्हा प्रभारी व प्रवक्ते प्रा कार्लस साठे सर बेलपिंपळगाव सोसायटीचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब राहींज शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते वसंतराव शेरकर ,खंडेराव सरोदे, मुमताज सय्यद कुंडलिक सरोदे ,




माजी उपसरपंच बंडोपंत चौगुले ,आप्पासाहेब शिंदे ,बाळासाहेब शिंदे ,कैलास शिंदे ,रामभाऊ शिंदे ,माने सर ,बबन शिंदे ,गणेश कोकणे इत्यादी उपस्थित होते

## पाणीटंचाई निवारणासाठी सीईओंकडे बारागाव नांदूरकरांचे साकडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** बारागाव नांदूर सह १५ गाव योजना ही अतिशय व्यवस्थितपणे नित्यनेमाने पाणी देण्यासाठी सर्व सोयी सुविधांनी जशी पूर्वी होती तशीच परत कार्यरत व्हावी यासाठी पाणीपुरवठा योजना समितीचे सर्व सदस्य प्रयत्न करीत आहेत. त्याच अनुषंगाने अध्यक्षा विद्याताई गाडे यांच्या नेतृत्वाखाली सर्व सदस्य हळूहळू या योजनेला पूर्वपदावर आणण्यासाठी कसोशीने प्रयत्न करीत आहेत. गेल्या पंधरा दिवसांपूर्वी जिल्ह्याच्या टंचाई आढावा बैठकीमध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना आपल्या योजनेच्या संदर्भातल्या




सर्व समस्या सांगितल्या होत्या व आम्हाला शासन दरबारी मोटार पंप घेण्यासाठी मदत व्हावी अशी विनंती त्यावेळेस करण्यात आली होती त्याचा पाठपुरावा म्हणून काल रविंद्र म्हसे, शिवाजीराव शेंडे आणि पाणीपुरवठा योजनेचे शौकत इनामदार यांनी जिल्हा परिषदेचे सीईओ श्री भंडारी यांची भेट घेऊन पाठपुरावा केला आहे.

या संदर्भात राहुरी नगर पाथर्डी मतदार संघाचे आमदार अक्षय दादा कर्डिले यांनी जिल्हा परिषदेचे सीईओ श्री भंडारी यांना फोन करून योजनेला जेवढी जास्तीत जास्त मदत करता येईल तेवढी करा अशा सूचना केल्या मुळे या योजने साठी होणाऱ्या कामाला गती मिळणार आहे.

## गोंडेगावात अवैध धंद्यांचा सुळसुळाट अवैध धंद्याचा त्वरित बंदोबस्त करा, कुऱ्हाडे यांची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील गोंडेगाव येथील मध्यवर्ती ( वडारवाडा ) भागात अवैध दारू विक्री जोरात सुरू असल्याने या परिसरात अवैध धंदे बोकाळल्याने परिसराची सध्या शांतता बिघडली आहेत.

सध्या दारु विक्री करणाऱ्याचा त्रासदायक ठरत असून यात पोतडाचा उपद्रव वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा हकनाक त्रास सहन करावा लागत आहेत.याबाबत, सामजिक कार्यकर्ते आण्णासाहेब रामदास कुऱ्हाडे यांनी शिर्डी अप्पर जिल्हाधिकारी तसेच अहिल्यानगर पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वरे केली असून,त्वरित अवैधरित्या धंदे बंद करावेत,अशी मागणी कुऱ्हाडे यांनी केली.

कुऱ्हाडे यांनी जिल्हाधिकाऱ्याना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शालेय विद्यार्थी येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना त्रास होतात.याच परिसरात शिवीगाळ करणे,अश्लिल भाषेत बोलणे,भांडण करणे,अशा अन्य प्रकाराच्या घटना होत असल्याने सर्वसामान्य जनतेला हकनाक त्रास दिला जात आहेत.याकडे प्रशासन सोयीस्करपणे दुर्लक्ष केले.यामुळे नागरिकांमध्ये आश्चर्य आणि संतापही व्यक्त होत आहेत.गावाच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या परिसरात अवैधरित्या धंद्याचा सुळसुळाट सुरूच आहेत.मात्र पोलीस याकडे दुर्लक्ष करीत आहेत.या घटनेमुळे लहान मुलांवर विपरीत परिणाम होत आहेत. सभ्य नागरिकांना या परिसरातून वावरताना अवैध धंद्याचे दर्शन घ्यावे लागत आहेत.

## व्यंकटेश कृपा शुगर मिल्सचे तुषार निघुते 'उत्कृष्ट कार्य व्यवस्थापक' पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी, :** शिरूर तालुक्यातील लक्ष्मीनगर येथील व्यंकटेश कृपा शुगर मिल्स लिमिटेडचे कार्य व्यवस्थापक तुषार नानासाहेब निघुते यांना वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (थखडचअ) तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्य व्यवस्थापक (एलशश्रश्रशपीं थेऑज्ञी चरपरसशऑ) या प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

पुणे येथील कोरेगाव पार्कमधील वेस्ट इन हॉटेल येथे आयोजित 'शुगर अँड बायोएनर्जी कॉन्फरन्स २०२६' दरम्यान हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्री नितीन गडकरी तसेच राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते निघुते यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचीही प्रमुख




उपस्थिती होती.

साखर उद्योगातील विविध घटकांसाठी विस्मा आयोजित स्पर्धेत व्यंकटेश कृपा शुगर मिल्सने कारखान्याच्या कार्यप्रणालीविषयीचा सविस्तर तांत्रिक अहवाल सादर केला होता. तज्ज्ञ समितीने केलेल्या सर्वंकष मूल्यमापनानंतर तुषार निघुते यांच्या उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्याची दखल घेत त्यांची प्रथम क्रमांकासाठी निवड करण्यात आली.

पुरस्कार स्वीकारताना कारखान्याचे अध्यक्ष संदीप तौर, संचालक मंडळाचे सदस्य व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच निघुते यांच्या कुटुंबीयांनीही या सोहळ्याला उपस्थित राहून त्यांच्या यशाचा आनंद साजरा केला.अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील रहिवासी असलेल्या तुषार निघुते यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आश्वी ग्रामस्थ, साखर उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि विविध स्तरांतील व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन केले असून या सन्मानामुळे व्यंकटेश कृपा शुगर मिल्सच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## शासकीय निधीच्या संभाव्य गैरवापराची चौकशी करा ; दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा नगरपंचायतीतील पाणीपुरवठा, साहित्य खरेदी व इतर विकासकामांच्या बिलांमध्ये गंभीर आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्यासह दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा सौ. शालिनीताई संजय सुखदान यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वरे केली आहे.



निवेदनात नमूद केल्यानुसार, सप्टेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत पाणीपुरवठा दुरुस्ती व देखभाल कामांसाठी सुमारे ५० लाख रुपयांहून अधिक खर्च दाखविण्यात आला आहे. मात्र, इतका खर्च करूनही शहरातील नागरिकांना अनेकदा आठ ते दहा दिवस पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी सातत्याने प्राप्त झाल्या आहेत.सदर खर्चासंदर्भातील कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला आहे. अनेक बिलांवर इन्व्हॉइस क्रमांक व तारीख नमूद नसणे, जीएसटी नियमांनुसार आवश्यक असलेले क्छछ/डअउ कोड नसणे, पुरवठादारांचे अधिकृत शिक्के नसणे, तसेच काही दस्तऐवजांमध्ये खाडाखोड झाल्याचा संशय असल्याचे निवेदनात म्हटले आहे. काही बिलांमधील वस्तूंची संख्या, दर व एकूण रक्कम यांचा ताळमेळ लागत नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.याशिवाय बाजारभावापेक्षा अधिक दराने साहित्य खरेदी दाखविण्यात आल्याचा तसेच प्रत्यक्ष साहित्याची आवक व वापराबाबत शंका निर्माण करणारी परिस्थिती असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नगरपंचायतीमार्फत उभारण्यात आलेल्या कुत्रा निवारा प्रकल्पाच्या तांत्रिक, प्रशासकीय व कायदेशीर वैधतेचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

काही व्यवहारांमध्ये एका पुरवठादाराच्या नावाने बिलांची नोंद असताना लाभ अथवा देयके अन्य व्यक्ती अथवा पुरवठादाराला मिळाल्याचा संशय निर्माण करणाऱ्या नोंदी आढळल्याचा दावाही करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार व पुरवठादार यांच्यात संगनमत झाले आहे का, याची चौकशी करणे आवश्यक असल्याचे सौ. सुखदान यांनी म्हटले आहे.

या सर्व प्रकरणांची वरिष्ठ स्तरावरील स्वतंत्र चौकशी समितीमार्फत निष्पक्ष तपासणी करून आर्थिक अपहार, बनावट बिले, शासकीय निधीचा गैरवापर किंवा कागदपत्रांमध्ये फेरफार झाल्याचे आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वरे करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीचे मूल्यमापन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाअंतर्गत जिल्हास्तरीय अतीउत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारासाठी नामनिर्देशित झालेल्या लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीचे नुकतेच जिल्हास्तरीय मूल्यमापन करण्यात आले. सांगली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील नऊ सदस्यीय समितीने ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेची सखोल पाहणी केली.

अभियानाच्या माध्यमातून सुशासनयुक्त, सक्षम, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित ग्रामपंचायती घडविण्याबरोबरच मनरेगा व विविध शासकीय योजनांचे प्रभावी अभिसरण, लोकसहभागातून विकास आणि सामाजिक न्यायाची अंमलबजावणी यावर भर देण्यात येत आहे. याच निकषांवर लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीचे मूल्यमापन करण्यात आले. समितीमध्ये सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे, सहाय्यक गट विकास अधिकारी अविनाश पाटील यांच्यासह विविध पंचायत समित्यांतील



विस्तार अधिकारी आणि विभागीय अधिकारी सहभागी होते. समितीने ग्रामपंचायतीच्या सर्व नोंदींची तपासणी करताना पिण्याचे पाणी, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, वृक्षारोपण, घरकुल योजना, रस्ते, पथदिवे, दलित वस्ती सुधारणा, सिंधुताई आदिवासी निवारा वसाहत, महिला स्वयंरोजगार, स्वच्छता उपक्रम, सौर ऊर्जा वापर, आरोग्य सुविधा, अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील सुविधा तसेच शालेय पोषण आहार यांची प्रत्यक्ष पाहणी केली. लोणी बुद्रुकची वाढती लोकसंख्या लक्षात घेता ग्रामपंचायतीने उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करून गावात विविध मूलभूत सुविधा निर्माण केल्या असून त्यांचे उत्तम व्यवस्थापन राखले आहे. याबाबत समिती सदस्यांनी समाधान व्यक्त करत ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांनी समिती सदस्यांचे स्वागत केले. कार्यक्रमास राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विवेक गुंड, विस्तार अधिकारी के. डी. अरगडे, एस. जी. माळी, उपअभियंता श्री. मुनोत, सरपंच कल्पना मैड, उपसरपंच गणेश विखे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष संपतराव विखे, विकास सोसायटीचे चेअरमन अशोकराव धावणे, ग्रामविकास अधिकारी कविता आहेर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.लोकसहभाग, सुशासन आणि विकासकामांच्या बळावर लोणी बुद्रुक ग्रामपंचायत जिल्ह्यात आदर्श ठरत असून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातील उत्कृष्टतेच्या शर्यतीत गावाने आपली भक्कम छाप उमटविली आहे.

## शहरातील पाणी पुरवठा व स्वच्छतेचा प्रश्न न सुटल्यास आमरण उपोषण,आपचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शहरातील पाणी पुरवठा व स्वच्छतेचा बोजवारा उडाला असून पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी तसेच शहरासह उपनगरातील स्वच्छतेच्या प्रश्नांबाबत सुधारणा न झाल्यास उपोषणासह त्रिव आंदोलन छेडले जाईल असा ईशारा आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष संदीप आलवणे यांनी निवेदनाद्वरे दिला आहे.

नगरपंचायत मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात संदीप आलवणे यांनी म्हटले आहे की अनियमितपणे होणारा पाणीपुरवठा व आठ आठ दिवस घंटा गाड्या नेवासा शहरासह उपनगरामध्ये नेवासा शहरासह उपनगरातील जनता हैराण झाली आहे. या बाबतीत नेवासा नगर पंचायतचे अधिकारी व पदाधिकारी बेजबाबदारपने चाल ढकल करून जनतेला वेड्यात काढण्याचा प्रयत्न करत आहे.

विशेष करून शहरातील विवेकानंदनगर व इतर उपनगरामध्ये पाणी प्रश्न व स्वच्छतेचा प्रश्न गंभीर झालेला आहे.या विरोधात आम्ही सर्व आम आदमी पार्टीच्या वतीने शहरातील जनतेसह सोमवार दि.१५ जून रोजी आमरण उपोषण करणार असून यापुढे होणाऱ्या परिणामाला नेवासा नगर पंचायत जबाबदार असेल असे निवेदनात स्पष्ट केले आहे. सदर निवेदन कार्यालयीन अधीक्षक सागर झावरे यांना देण्यात आले. यावेळी आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष संदिप आलवणे,सलीम सय्यद,विठ्ठल मैदाड, करीमभाई सय्यद उपस्थित होते.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# त्रिमूर्तीच्या खेळाडूंची राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत पाच पदकांची कमाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : दि.३जून ते ७ जून २०२६ दरम्यान मुंबई येथे सुरू असलेल्या २९ व्या कॅप्टन एस. जे. इजिकिएल स्मृती महाराष्ट्र राज्य नेमबाजी अजिंक्यपद राज्यस्तरीय स्पर्धेत श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील विद्यालयाचा खेळाडू ऋग्वेद वाघमारे याने २५ मी (२२) स्टँडर्ड पिस्तोल खेळ प्रकारात ३०० पैकी २४८ गुण मिळवून युथ व जुनिअर गटात दोन सिल्वर पदक प्राप्त केले तर प्रवीण कोळपे याने ५० मी.३पी रायफल खेळ प्रकारात युथ व ज्युनिअर गटात दोन सिल्वर पदक प्राप्त केले. या स्पर्धेत त्रिमूर्ती पब्लिक स्कूलची समीक्षा वाल्हेकर हिने २५ मी स्पोर्ट्स पिस्तोल खेळ प्रकारात युथ गटात ब्राँझ पदक प्राप्त केले.

कु. राजेश्वरी कोळेकर हिने २५ मी स्पोर्ट्स पिस्तोल खेळ प्रकारात चौथा क्रमांक मिळविला. सोहम केदार १० मी पिस्तोल व महारुद्र नांगरे याची १० मी पीप साईट रायफल प्रकारात गोवा येथे होणाऱ्या सब राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. वरील यशस्वी खेळाडूंना त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगे, उपाध्यक्षा स्नेहलताई घाडगे-चव्हाण, सहसचिव डॉ. श्रुती घाडगे (आमले), विश्वस्त चेतन चव्हाण, डॉ.गौरव आमले, वित्त विभाग प्रमुख अनिता जाधव,



प्राचार्य सोपानराव काळे,त्रिमूर्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या दिपाली बाविस्कर, उपप्राचार्य अरविंद देशमुख, दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे, त्रिमूर्ती इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या श्रीदेवी नायर, समन्वयक अनुराधा गोरे, त्रिमूर्ती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य आरसुळे, दत्तात्रय वांढेकर, संतोष निंबाळकर, बाळासाहेब साबळे, एकनाथ कापसे, नामदेव ताके, अंजली होन, दत्तू गर्जे, अशोक कानवडे, संतोष राऊत, श्रीमंत काळे, शिवाजी झांबडे, उमाजी जंगले, बाबासाहेब तांबे, परमेश्वर कसाळ, क्रीडा समन्वयक संजय सिंग चव्हाण, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

वरील यशस्वी खेळाडूंना रायफल शूटिंगचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक छबुराव काळे यांचे मार्गदर्शन तर संभाजी निकाळजे, अभिजीत दळवी, महादेव काकडे, अशोक पानकडे, संदीप वाघमारे, मुकेश जाधव, राहुल शेळके, निलेश पैठणे, समीर पठाण, अमीर शेख, आसिफ शेख, खान आदी प्रशिक्षकांचे सहकार्य लाभत आहे.

## कोपरगावातील महिला समुपदेशन केंद्र जागेअभावी बंद होण्याच्या मार्गावर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पोहेगाव** : महिलांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व कायदेशीर समस्यांचे निराकरण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारे कोपरगाव येथील महिला समुपदेशन केंद्र सध्या जागेअभावी बंद होण्याच्या मार्गावर असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत महिला समुपदेशक वैशाली झाल्टे व सचिन विखे यांनी चिंता व्यक्त केली आहे.

महिला व बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध घालण्यासाठी तसेच पीडितांना संरक्षण व मदत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत महिला समुपदेशन केंद्रे कार्यरत आहेत. शासन निर्णयानुसार राज्यातील ३५ जिल्ह्यांमध्ये १०५ महिला समुपदेशन केंद्रे सुरू असून तालुकास्तरावर पोलीस ठाण्यांच्या आवारात ही केंद्रे चालविण्याची तरतूद करण्यात आली आहे. या केंद्रांना आवश्यक जागा, फर्निचर, दूरध्वनी, स्टेशनरी व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही संबंधित यंत्रणांवर सोपविण्यात आली आहे.

कोपरगाव येथील जुने पोलीस ठाणे पाडून नवीन इमारतीचे बांधकाम सुरू असल्याने महिला समुपदेशन केंद्र तात्पुरत्या स्वरूपात पंचायत समितीच्या घरकुल डेमो हाऊसमध्ये स्थलांतरित करण्यात आले होते. मात्र राज्य व केंद्रस्तरीय तपासणी पथकांच्या पाहणीसाठी ही जागा आवश्यक असल्याने पंचायत समितीने केंद्र अन्यत्र हलविण्याबाबत पत्र दिले. त्यानंतर पोलीस ठाणे, तहसील कार्यालय तसेच इतर शासकीय इमारतींमध्ये जागा उपलब्ध करून देण्यासाठी वारंवार पाठपुरावा करण्यात आला. मात्र अद्यापही केंद्रासाठी कायमस्वरूपी जागेची व्यवस्था होऊ शकलेली नाही.

महिला समुपदेशन केंद्रात कौटुंबिक वाद, पती-पत्नी मतभेद, घरगुती हिंसाचार, महिलांवरील अत्याचार, घटस्फोट, पोटगी, मुलांच्या पालकत्वासंबंधी प्रश्न तसेच मानसिक तणाव व नैराश्यग्रस्त महिलांना समुपदेशन व मार्गदर्शन केले जाते. महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती देऊन त्यांना सशक्त करण्याचे कामही या केंद्रामार्फत केले जाते.

या केंद्राच्या जागेच्या प्रश्नाबाबत वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा सुरू असून लवकरच सकारात्मक मार्ग निघेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. मात्र वेळेत पर्यायी जागा उपलब्ध न झाल्यास कोपरगावातील हे महत्त्वपूर्ण महिला समुपदेशन केंद्र बंद होण्याची भीती व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत अनेक गरजू महिलांना आधार देणारी ही सेवा खंडित होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

# नगर - कोपरगाव रस्ता पावसाळ्यात बंद होणार?

सलीमखान पठाण | राष्ट्र सह्याद्री

**अहमदनगर** : नगर - कोपरगाव या मार्गाचे काम गेली एक वर्षे सुरू आहे.प्रशासन आणि लोकप्रतिनिधीच्या उदासीनतेमुळे रखडलेला हा देशातील एकमेव रस्ता आहे.या रस्त्याने राज्य आणि देशभरातील लाखो वाहने दररोज ये जा करतात. राजकारणाचा बळी ठरलेल्या या रस्त्याचे काम सध्या सुरू असले तरी कामाचा समाज दर्जा, संथ गती आणि जागोजागी खोदून ठेवलेल्या रस्ता यामुळे पावसाळ्याच्या उंबरठ्यावर येत्या काही दिवसात रस्त्याचे काम बंद होऊन सुमार दर्जाचे डांबरीकरण झालेल्या रस्ता देखील पावसामुळे उघडल्या जाणार असल्याने आणि पावसाळ्यात हा रस्ता बंद होण्याची भीती या रस्त्यावरून दररोज प्रवास करणारे प्रवासी व्यक्त करीत आहेत.

राजकीय कुरघोडीमध्ये हा देशाचा प्रमुख रस्ता सापडला आहे.अनेक वेळा निधी मंजूर झाला अनेक वेळा काम मंजूर झाले अनेक ठेकेदार पळून गेले परंतु हा रस्ता काही दुरुस्त झाला नाही.अलीकडे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी



व्यक्तिशः लक्ष घातल्याने रस्त्याला निधी मिळाला काही ठिकाणी काम सुरू झाले आहे एका बाजूने काम सुरू असताना दुसऱ्या बाजूने वाहतूक सुरू असते त्यामुळे रस्त्याच्या कामामध्ये देखील प्रचंड अडथळे येतात.

सद्यस्थितीमध्ये हा रस्ता नगर ते राहुरीचे दरम्यान अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात खोदण्यात आला आहे त्यामुळे एका बाजूने वाहतूक सुरू असते या वाहतुकीला विशिष्ट नसल्याने अनेक निष्पाप लोकांचे बळी आतापर्यंत गेलेले आहेत.सध्या विद्यापीठ मिळत आणि राहुरी फॅक्टरी या भागामध्ये रस्त्याचे काम मोठ्या प्रमाणात चालू आहे मात्र कामाची गती अतिशय संथ आहे त्यामुळे आता पावसाळा सुरू होणार असल्याने काम बंद होण्याची शक्यता आहे काही ठिकाणी दोन्ही बाजूने रस्ता करून ठेवण्यात आला आहे त्यामुळे वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

ज्या भागामध्ये रस्त्याचे डांबरीकरण करून डागडुजी करण्यात आली आहे तो रस्ता देखील आता उखडायला लागला आहे. या रस्त्यावरून अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते. त्यामुळे दुरुस्त केलेल्या रस्ता सुद्धा तग धरत नाही. अनेक ठिकाणी सध्याच मोठमोठे खड्डे पडले आहेत पावसाळ्यामध्ये या रस्त्याची पुन्हा चाळण होण्याची शक्यता असून कदाचित हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्याची वेळ देखील येऊ शकते.दक्षिण आणि उत्तर भारताला जोडणारा हा रस्ता जिल्ह्याच्या दृष्टीने अपशकुन ठरला आहे.अनेक वेळा दुरुस्तीसाठी काम सुरू करून देखील वेळेत पूर्ण होत नसल्याने आधी पूर्ण केलेला रस्ता लगेच खराब होतो.या रस्त्यामुळे प्रवासी आणि नागरिकांना आत्तापर्यंत मोठ्या मनस्ताप सहन करावा लागला आहे.दररोज वाहतूक ठप्प होत असल्याने तासंतास लोकांना प्रत्यक्ष करावी लागते.रुग्णवाहिकांना सुद्धा या ठप्प वाहतुकीमध्ये अडकून पडावे लागते .लांबचा प्रवास करणाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो .

सध्या रस्त्याचे सुरू असलेले काम अत्यंत धीम्या गतीने होत आहे त्यामुळे खड्डे चुकवत प्रवास करताना चालक आणि प्रवासी यांना जीव मुठीतच धरावा लागतो .दुरुस्त करण्यात आलेल्या रस्ता पावसाळ्यापर्यंत टिकेल अशी अजिबात शक्यता दिसत नाही त्यामुळे ऐन पावसाळ्यामध्ये या ठिकाणी मोठमोठे खड्डे पडून रस्ता बंद होण्याची दाट शक्यता असल्याने केंद्रीय राज्य बांधकाम विभागाने याबाबत तातडीने पावले उचलावीत व लवकरात लवकर हा रस्ता सुरळीत करावा अशी मागणी वाहन चालक, मालक, प्रवासी व नागरिक यांनी केली आहे.

## अमृतवाहिनी बँकेचा 'भारतरत्न सहकारीता पुरस्कारा'ने गौरव

### तीन राष्ट्रीय पुरस्कारांची कमाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेने आपल्या उत्कृष्ट कामकाजाच्या जोरावर देशपातळीवर मानाचा सन्मान मिळवला आहे. उत्तर प्रदेशातील लखनऊ येथे आयोजित 'भारत को-ऑपरेटिव्ह बँकिंग समिट २०२६'मध्ये बँकेला प्रतिष्ठेचा 'भारतरत्न सहकारीता पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. यासोबतच बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी यांना 'बेस्ट चेअरमन', मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती यांना 'बेस्ट सीईओ' तसेच बँकेला 'बेस्ट एनपीए मॅनेजमेंट' पुरस्काराने गौरविण्यात आले.




काँग्रेसचे राष्ट्रीय वर्किंग कमिटी सदस्य तथा माजी महसूल व शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या या बँकेने शेतकरी, सभासद आणि ग्राहकांचा विश्वास संपादन करत सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुरस्कार वितरण समारंभात आसाम राज्य सहकारी बँकेचे चेअरमन व आमदार विश्वजीत फुकण, भारत नेटवर्क ग्रुपचे अनुपम गुप्ता आणि आशिष श्रीवास्तव यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, व्हाईस चेअरमन ड. नानासाहेब शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती आणि असिस्टंट जनरल मॅनेजर धनंजय जाधव यांनी पुरस्कार स्वीकारले. उत्कृष्ट व्यवस्थापन, आधुनिक डिजिटल प्रणाली, अचूक कामकाज, तत्पर सेवा, शून्य टक्के नेट एनपीए आणि सुमारे १२०० कोटी रुपयांची उलाढाल या निकषांच्या आधारे बँकेची निवड करण्यात आली.

युनियन बँकेचे निवृत्त अधिकारी असलेल्या सुधाकर जोशी यांनी आपल्या कार्यकाळात बँकेत अनेक आधुनिक उपक्रम राबवत कामकाजाची गुणवत्ता उंचावली. त्याबद्दल त्यांना 'बेस्ट चेअरमन' पुरस्कार मिळाला. तर अधिकारी, कर्मचारी, सभासद आणि ग्राहक यांच्यात प्रभावी समन्वय साधून उत्कृष्ट प्रशासन केल्याबद्दल सुशील गुजराती यांना 'बेस्ट सीईओ' म्हणून गौरविण्यात आले. मागील आर्थिक वर्षात बँकेने नेट एनपीएचे प्रमाण शून्यावर राखल्यामुळे 'बेस्ट एनपीए मॅनेजमेंट' पुरस्कारही पटकावला.

या यशाबद्दल बोलताना चेअरमन सुधाकर जोशी यांनी हा सन्मान संपूर्ण संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सांघिक प्रयत्नांचे फलित असल्याचे सांगितले. दरम्यान, लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे यांच्यासह विविध मान्यवरांनी बँकेचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत प्रवरा पब्लिक स्कूलचे नेत्रदीपक यश



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी एप्रिल २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

या परीक्षेत विद्यालयातील एकूण २४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विशेष म्हणजे सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम गुण प्राप्त करून यश मिळविले असल्याची माहिती विद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी दिली.

स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता सहावीचा दीप प्रसाद खंडाळे याने जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक पटकावत विशेष यश मिळविले. तसेच अलीजा अयुब सय्यद हिने तालुकास्तरावर चतुर्थ क्रमांक, तर ज्योती प्रसाद खंडाळे हिने तालुकास्तरावर पाचवा क्रमांक प्राप्त केला. इयत्ता सातवीतील गीता निलेश दिवटे हिने तालुकास्तरावर तृतीय क्रमांक, तर सार्थक एकनाथ अंभोरे याने तालुकास्तरावर चतुर्थ क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात भर घातली.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांची पुढील वैज्ञानिक कार्यशाळेसाठी निवड झाली असून ते इस्रो शैक्षणिक सहलीसाठीही पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामागे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे, पर्यवेक्षिका एम. एस. जगधने, शुभांगी रत्नपारखी तसेच सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## 'हेरिटेज वॉक'मधून पेमगिरीच्या ऐतिहासिक वैभवाचा अभ्यास : प्रकाश आरोटे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : अकोले - संगमनेर परिसरातील ऐतिहासिक वारसा जतन करून तो नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'हेरिटेज वॉक' उपक्रमांतर्गत रविवारी पेमगिरी येथील ऐतिहासिक शहागड (प्रेमगड) आणि महाकाय वटवृक्ष तिसऱ्या अभ्यास सहलीचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले होते.

सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयाचा इतिहास विभाग व जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला. सकाळी संगमनेर बसस्थानकातून सहलीला प्रारंभ झाला. पेमगिरी येथे पोहोचल्यानंतर सहभागी सदस्यांनी शहागडाचा इतिहास, तेथील सातवाहन टाके स्थापत्यवैशिष्ट्ये आणि ऐतिहासिक



महत्त्व समजून घेतले. यावेळी इंजिनिअर नानासाहेब खर्डे यांनी प्राचीन ते मध्ययुगीन इतिहासाचा आढावा घेत सातवाहनकालीन पाण्याच्या टाके याबाबत सविस्तर माहिती दिली.

संयोजक प्रा.विठ्ठलराव शेवाळे यांनी शहाजी महाराजांच्या कार्याचा विशेष उल्लेख करताना सांगितले की, निजामशाहीचा वारसदार मुर्तजा याला जीवधन किल्ल्यावरील नजरकैदेतून मुक्त करून शहाजी महाराजांनी पेमगडावर आणले आणि त्याला गादीवर बसवून स्वतः सन १६३३ ते १६३६ या काळात कारभार सांभाळला. स्वराज्याच्या संकल्पनेची बीजे याच भूमीत रुजली आणि शहाजीराजांच्या पावलांनी हा गड पावन झाला.छत्रपती शिवरायांमध्ये स्वराज्याची बीज रोपन केले आणि जिजाबाईंनी खतपाणी घातले,असे नमूद केले. यानंतर सहभागी सदस्यांनी पेमगिरी येथील महाकाय वटवृक्षाला भेट दिली.

वाल्मीक कोल्हे आणि डॉ.भुतांबरे यांच्या मालकीच्या शेतातील या वटवृक्षाचा इतिहास, त्याचा अडीच ते पावणेतीन एकरांपर्यंत विस्तार आणि 'जाखमत बाबा'शी संबंधित लोककथा यांची प्रा.शेवाळे यांनी रंजक माहिती दिली.त्यानंतर सर्वांनी गावातील प्राचीन मारुती मंदिरात दर्शन घेतले. सहली दरम्यान वाल्मीक कोल्हे परिवारातर्फे अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारनंतर सर्व सदस्य सुखरूप संगमनेर येथे परतले.

प्रकल्प प्रमुख रमेश थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. प्रा. विठ्ठल शेवाळे यांनी सहलीचे नियोजन केले तर डॉ.माणिकराव शेवाळे यांनी स्कूलबसची सुविधा उपलब्ध करून दिली.

या उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे, डॉ.उमा कुलकर्णी, सतीश मालवणकर, ॲड. ज्ञानदेव सहाणे यांच्यासह इतिहास विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'हेरिटेज वॉक' उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक ऐतिहासिक स्थळाचा इतिहास, वास्तुशैली आणि त्यामागील संदर्भ तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून अत्यंत रंजक आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने उलगडला जातो.

त्यामुळे या उपक्रमात युवकांसह ज्येष्ठ नागरिकांचाही उत्स्फूर्त सहभाग वाढत असून, हा अनुभव माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि आनंददायी ठरत असल्याची भावना सहभागी सदस्यांनी व्यक्त केली.

## द • ख • ल

### कृषी महोत्सवाचे उद्घाटन श्री नरेंद्राचार्यजी महाराजांच्या हस्ते



**कोल्हार** : विश्वगौरव विभूषित महायोगी प.पू. स्वामी श्री गगनगिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताह सोहळा २०२६ निमित्त आयोजित कृषी महोत्सवाचे भव्य उद्घाटन दक्षिण पीठाचे पीठाधीश श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या शुभहस्ते होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताह नियोजन समितीच्या विशेष निमंत्रणाचा स्वीकार करून ते या सोहळ्यास प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. हा उद्घाटन सोहळा मंगळवार, ९ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता क्षेत्र राजापूर रोड, गुंजाळवाडी येथे आयोजित करण्यात आला आहे. उद्घाटनानंतर नरेंद्राचार्यजी महाराजांचे अमृतमय प्रवचन होणार असून त्याचा लाभ हजारो भाविकांना मिळणार आहे. प्रवचनामध्ये 'अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहार' या त्रिसूत्रीची सांगड घालत सुखी, समाधानी व यशस्वी जीवनाचा मार्ग उलगडून सांगितला जाणार आहे. भक्तीमुळे माणसाची निर्णयक्षमता, विचारांची प्रगल्भता आणि दूरदृष्टी कशी विकसित होते, तसेच मानवता धर्माचे पालन व सेवाभावाचे महत्त्व यावरही ते मार्गदर्शन करणार आहेत.

### खंडाळा येथे प्रवरेच्या कृषीदूतांचे आगमन

**लोणी** : श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा येथे कृषी



महाविद्यालय ,लोणी येथील कृषीदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीदूतांचे स्वागत केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार कृषीदूत प्रसाद विखे ,तेजस शिरसाठ ,प्रणव कासार ,ऋषिकेश लोहकरे ,समर्थ शिंदे ,कैवल्य खंडागळे ,भूषण बस्ते ,गौरव घोलप हे खंडाळा येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी ग्रामपंचायत खंडाळा सरपंच छाया बर्डे, उपसरपंच भारती वाघमारे ग्रामविकास अधिकारी स्वप्नाली गागरे ,ग्रामपंचायत कर्मचारी वैभव म्हसे व ग्रामस्थ अशोक मुंढे,गणेश अभंग,बबलू साबदे व इतर ग्रामस्थांनी स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषीदूत येथील शेतकऱ्यांना सदर कार्यक्रमांतर्गत विद्यार्थी ग्रामीण जीवन आणि कृषी तंत्रज्ञान, कीड व रोग ओळख, एकात्मिक व्यवस्थापन यांची माहिती शेतकऱ्यांनपर्यंत प्रात्यक्षिकाद्वारे पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे. वास्तविक जीवनातील कृषी समस्या व शेतकऱ्यांसमोरील आव्हानांना सोडविण्यास मदत करतील.

### बाभळेश्वरला बुधवार पासून शेळीपालन विषयावर दोन दिवसीय व्यावसायिक प्रशिक्षण

**लोणी** : पायरेन्सच्या कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे बुधवार (दि.१० जुन) पासून दोन दिवसांच्या कालावधीचे 'आधुनिक शेळीपालन' या विषयावर ग्रामीण युवक-युवतींसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी दिली. ग्रामीण भागातील युवक-युवतींना कृषी पूरक व्यवसायाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये शेळ्यांच्या विविध जाती, चारा व्यवस्थापन, संगोपन, रोग व आजार नियंत्रण, लसीकरण, प्रकल्प आराखडा तयार करणे, मार्केटिंग, शेड उभारणी तसेच बँकिंग व विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. याशिवाय प्रत्यक्ष प्रक्षेत्र भेटीद्वारेही मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण केवळ ३० प्रशिक्षणार्थ्यांसाठी मर्यादित असून इच्छुक व गरजू युवक-युवतींनी प्रवेशासाठी ८२०८६४२८९९ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा कृषी विज्ञान केंद्राशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### EPS-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचा ९ वा वर्धापन दिन उत्साहात

**श्रीरामपूर** : EPS-९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचा (NAC) ९ वा वर्धापन दिन बुलडाणा येथील मुख्यालयात राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोक राऊत यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, डॉ. नंदकुमार पालवे व डॉ. आरती पालवे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या तसेच संघटनेच्या चळवळीत विशेष योगदान देणाऱ्या ज्येष्ठ सभासदांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. राधेश्याम चांडक यांना 'श्रमिक भूषण' तर डॉ. नंदकुमार पालवे व डॉ. आरती पालवे यांना 'श्रमिक समाज गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रमुख अतिथींनी संघटना अधिक बळकट करण्याचे आवाहन करत ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सातत्यपूर्ण संघर्ष केल्यास EPS-९५ पेन्शनधारकांना न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात कमांडर अशोक राऊत यांनी संघटनेच्या राष्ट्रीय स्तरावरील प्रयत्नांचा आढावा घेत लवकरच यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमास महाराष्ट्रासह बुलडाणा, संभाजीनगर, जालना, अकोला, जळगाव आदी जिल्ह्यांतील पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी EPS-९५ पेन्शनधारकांच्या हक्कांसाठी एकजुटीने लढा सुरू ठेवण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.

## पान १ वरुन

### इंडिया आघाडी गलितगात्र विरोधकांचे मनोबल खच्ची

राजकारण सुरू आहे. ही कसली देशभक्ती आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. विरोधकांवर हल्लाबोल करताना शिंदे म्हणाले की, देशभक्तीची भाषा करण्याऐवजी काही विरोधक देशाच्या हिताविरोधात भूमिका घेत आहेत. त्यामुळे जनतेमध्ये त्यांची विश्वासार्हता कमी होत चालली आहे. देवेंद्र फडणवीस यांना बढती आणि स्वतःला मुख्यमंत्री करण्याबाबत बच्चू कडू यांनी केलेल्या विधानावर प्रतिक्रिया देताना शिंदे म्हणाले की, त्या विधानाची माहिती घेऊनच ते बोलतील.शेतकरी कर्जमाफीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला असून त्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. अर्थसंकल्पात त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळेल.तसेच कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांबाबतही सरकार सकारात्मक निर्णय घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीबाबत विचारले असता, काही लोक पूर्वीच्या गोष्टी विसरून पुन्हा एकत्र येत असतील तर ती त्यांची बाब असल्याची टिप्पणी त्यांनी केली.

### श्रीगोंद्याच्या तरुणाचा साकुर जवळ अपघातात मृत्यू

दरम्यान, अपघातानंतर संबंधित पिकअप वाहनाऐवजी दुसरे वाहन पोलीस ठाण्यात आणल्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. काही स्थानिक पत्रकारांनी या बाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर पोलिसांनी तपासाची दिशा बदलून प्रत्यक्ष अपघातग्रस्त वाहन जमा केले आहे. त्यानंतर संबंधित वाहन पोलीस ठाण्यात जप्त केले आहे. अपघातानंतर चालकाने घटनास्थळ सोडल्याचा आरोपही स्थानिकांकडून करण्यात येत आहे. तसेच चालक आणि वाहन मालकाविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती. याप्रकरणी पोलीस स्टेशन मध्ये विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास घारगाव पोलीस स्टेशन संगमनेर हे करीत आहेत.

### स्वस्त सोन्याचे अमिष दाखवून लुटणारी टोळी जेरबंद

फडणवीस यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नागपूर शहरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलावर चौकाच्या ठिकाणी भविष्यातील वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. अशा ठिकाणी वाहतूक कोंडी टाळण्याच्या कार्यवाही करावी. अमरावती- बडनेरा मार्गावरील जुना रेल्वे उड्डाण पूल असून याठिकाणी नवीन रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात यावा. महारेलने कामांचे प्रधान्यक्रमानुसार टप्पे पाडावेत. पायाभूत सुविधांच्या कामांसाठी हुडकोकडून कर्ज उपलब्ध करून घ्यावे. हुडकोने बँकांकडून कर्ज न घेता वेगळी व्यवस्था उभारून बाजारातील स्पर्धेचा अंदाज घेत शासनाला दिलेल्या कर्जावरील व्याज कमी आकारावे. त्याचबरोबर महारेल हे महामंडळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आणण्यासाठी कार्यवाही गतीने पूर्ण करावी. महारेलमार्फत पूर्ण करण्यात आलेल्या कामांचे देयक राज्य शासनाकडून तातडीने अदा करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. हुडकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजय कुलश्रेष्ठ, अपर मुख्य सचिव (नगर विकास) असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, सचिव (नियोजन) शैला ए आदी यावेळी उपस्थित होते. महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल यांनी बैठकीत सादरीकरण केले.

### स्वस्त सोन्याचे अमिष दाखवून लुटणारी टोळी जेरबंद

दागिने असा एकूण ५२ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने चोरून नेला. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दरोड्याचा हा गुन्हा गांभीर्याने घेत आरोपींना तात्काळ अटक करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना दिले होते. त्यानुसार कबाडी यांनी विशेष पथक तयार केले. गुप्त माहितीच्या आधारे पथकाने नांदेड जिल्ह्यातील झेंडीगुळा (लोणी) ता. किनवट येथे धाड टाकून पाच जणांना शिताफिने ताब्यात घेतले. शिवाजी उर्फ शिवा विठ्ठल मोहिते (वय ५२, रा. झेंडीगुळा, ता. किनवट, जि. नांदेड), राजु उर्फ चंदु रामदास मोहिते (वय ३६, रा. झेंडीगुळा, ता. किनवट, जि. नांदेड), अक्षय उर्फ आकाश रामदास मोहिते (वय २७, रा. मालठा, ता. हातगाव, जि. नांदेड), छगन दशरथ मोहिते (वय ३६, रा. याडी, ता. नेर, जि. यवतमाळ), दिनेश सुदाम जाधव (वय २४, रा. दगडवाडी, ता. हातगाव, जि. नांदेड) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, पोलिसांनी त्यांच्याकडून १६ लाख ५० हजार रुपये रोख, १ लाख ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, ८ लाख रुपये किंमतीची एक स्विफ्ट कार, बनावट सोन्याची नाणी आणि कोयता असा एकूण २६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे या प्रकरणाचा पुढील तपास अहिल्यानगर तालुका पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, सपोनि हरिष भोये, पोउपनि अनंत सालगुडे आणि त्यांच्या पथकाने केली.

### नगर-दौंड रोडवर अपघात; लष्करी जवानाचा मृत्यू

मूळगावी सुरेगाव येथे गेले होते. तेथून रात्री उशिरा ते केडगावला येण्यासाठी निघाले. खंडाळा शिवारात कार्ले वस्ती जवळ नगरहून दौंडच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव वेगातील महिंद्रा पिक अप गाडीने त्यांच्या मारुती कारला समोरून जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की त्यावेळी मोठा आवाज झाला. या आवाजाने परिसरातील रोहन कार्ले व त्यांच्या खडी क्रशरवरील कामगार जागे झाले. त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्तांना मदत केली. रुग्णवाहिका बोलावली व पोलिसांना डायल ११२ वर फोन करून माहिती दिली. या अपघातात मारुती कारचा चक्काचूर झाला होता. त्यातील राजू भालसिंग यांचा जागीच मृत्यू झाला होता. तर पिकअप मधील दोघेजण ही जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. तर मयत भालसिंग यांचा मृतदेह पोलिसांनी शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला. तसेच अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करत वाहतूक सुरळीत केली. मयत भालसिंग यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, भाऊ, भावजय असा परिवार आहे.

### तृणमूलला भगदाड...

निर्णयप्रक्रिया काही व्यक्तींच्या हातात केंद्रीत झाल्याचा आरोप केला. पक्षाच्या मूळ कार्यकर्त्यांना बाजूला सारण्यात आल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. गेल्या १५ वर्षांच्या कारभारामुळे पक्ष जनतेपासून दूर गेल्याचे मत त्यांनी मांडले. दरम्यान, बंडखोर गटाशी संबंधित नेत्यांनीही राय यांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शविल्याचे वृत्त आहे. त्यामुळे तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे समोर येत असल्याचे चित्र दिसत आहे. या सर्व घडामोडींमुळे पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आगामी काही दिवसांत तृणमूल काँग्रेसमधील नाराज गट नेमकी कोणती भूमिका घेतो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# राहुरी-शनीशिंगणापूर रेल्वे मार्गासाठी जमीन मोजणीला सोनईकराचा तीव्र विरोध शेतकरी एकवटले

## भूमीअभिलेख पथकाला परतावे लागले माघारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

सोनई : प्रस्तावित राहुरी-शनीशिंगणापूर रेल्वे मार्गासाठी जमीन अधिग्रहणाच्या अनुषंगाने सोमवारी (दि. ८ जून) सोनई परिसरातील बेल्हेकरवाडी येथे करण्यात येणाऱ्या मोजणीला शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला. शेकडो शेतकरी एकत्र येऊन मोजणी प्रक्रिया रोखल्याने शासनाच्या भूमापन पथकाला मोजणी न करताच माघारी परतावे लागले. मिळालेल्या माहितीनुसार, धार्मिक पर्यटन वाढी साठी प्रस्तावित २१.८४किमी राहुरी-शनीशिंगणापूर रेल्वे मार्गासाठी आवश्यक असलेल्या जमिनींच्या अधिग्रहण प्रक्रिये अंतर्गत घोडेगाव (ता. नेवासा) येथील भूमीअभिलेख कार्यालयाच्या वतीने मोजणीचे नियोजन करण्यात आले होते. घोडेगाव येथील भूमीअभिलेख विभागाच्या अधिकारी अनिता भिंगारदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाचे भूमापन पथक सोमवारी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या



सुमारास बेल्हेकरवाडी परिसरात दाखल झाले. मात्र, मोजणीसाठी अधिकारी येत असल्याची कुणकुण लागताच सोनई, बेल्हेकरवाडी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. शेतकऱ्यांनी मोजणी पथकाला घेराव घालत रेल्वे मार्गासाठी जमीन अधिग्रहणास ठाम विरोध असल्याची भूमिका मांडली. आपल्या बागायती आणि उत्पादक जमिनी रेल्वे प्रकल्पासाठी देण्यास नकार देत पुन्हा मोजणीसाठी येऊ नये, अशी मागणी त्यांनी के ली.

शेतकऱ्यांचा वाढता विरोध लक्षात घेता प्रशासनाने परिस्थिती शांततेने हाताळण्याचा प्रयत्न केला. अखेर मोजणीची प्रक्रिया स्थगित ठेवत अधिकारी वर्गाला माघारी परतावे लागले. यावेळी भूमीअभिलेख विभागाच्या अधिकारी अनिता भिंगारदिवे यांनी मोजणीस विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांचा घटनास्थळी पंचनामा केला तसेच संबंधितांच्या स्वाक्षऱ्याही घेतल्या. याबाबत वार्ताहरांशी बोलताना अनिता भिंगारदिवे म्हणाल्या की, सदर जमीन अधिग्रहण प्रक्रियेला स्थानिक शेतकऱ्यांचा प्रचंड विरोध असल्याचे निदर्शनास आले आहे. शेतकऱ्यांच्या भावना आणि हरकतींची नोंद पंचनाम्यात करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल.याबाबत शासन स्तरावर पुढील निर्णय घेतला जाईल असे भिंगारदिवे यांनी सांगितले.

राहुरी शिंगणापूर अंतर कमी असल्यामुळे या रेल्वे प्रकल्पाची गरज नाही.याबाबत मी मुंबई येथे बैठक घेतली आहे.तरी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना भेटून परिस्थिती समजून सांगू शेतकऱ्यांच्या बागायती जमिनी जाऊ देणार नाही.असे जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी राहुरी येथे नवनिर्वाचित आ.प्राजक्त तनपुरे यांच्या सत्कार कार्यक्रमात बोलताना सांगितले.

"बागायती जमिनी वाचविण्यासाठी शेतकऱ्यांचा निर्धार:
सोनई व बेल्हेकरवाडी परिसरातील जमिनी बारमाही बागायती स्वरूपाच्या आहेत. या जमिनींवर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यामुळे रेल्वे मार्गासाठी आमच्या सुपीक जमिनी घेऊ नयेत. यासंदर्भात परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या आहेत.

**भारत दरंदले (चपळे),**
**शेतकरी,(सोनई बेल्हेकरवाडी)**

"राहुरी शिंगणापूर अवघ्या १८किमी रेल्वे मार्गासाठी आमच्या अल्पभूधारक बागायती शेतकऱ्यांचे जीवन शासन उद्धस्थ करणार का?आधीच नोकऱ्या रोजगार नाहीत आमचा शेती दुध धंदा बंद करून तरुण देशोधडीला लावू नये. राहुरी रस्त्यावर पिंपरी उड्डाण पुलाजवळ शिंगणापूर रेल्वे थांबा करावा".

**अनिल बाबासाहेब निमसे**
**युवा शेतकरी सोनई**

# गुटखा विकणारे, खाणाऱ्यावरही कारवाई

## तुकाराम मुंढे यांचा वेगळा फंडा

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** अन्न आणि औषध प्रशासनाचे नवे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा विकणाऱ्यांना थेट आपल्या कारवाईतून इशारा दिला आहे. महाराष्ट्रात गुटखा विकणे बेकायदेशीर आहे. येथून पुढे विकणारे आणि खाणारे अशा दोघांवरही कारवाई करण्याचा इशारा मुंडे यांनी दिल्याने शौकिनांमध्ये मात्र प्रचंड खळबळ उडाली आहे महाराष्ट्राच्या सीमेला लागून असलेल्या राज्यातून मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुटख्याची तस्करी होत असते. दूध, तुप, खाद्य तेल हे टार्गेटवर असताना तुकाराम मुंढे यांनी आता गुटखा विक्रेत्यांना टार्गेटवर घेतले आहे. गुटखा विक्रेत्यांवर थेट गुन्हे दाखल करणे, सुरुच ठेवले आहे. तसेच गुटखा विक्रेत्यांना आपण कोणत्याही प्रकारे सूट कारवाई दरम्यान देणार नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गुटख्याच्या व्यसनाने तरुण ग्रासलेले आहेत. बंदी असतानाही गुटखा मोठ्या प्रमाणात विकला जात आहे. कोव्हिड काळात तर गुटखा जास्त किंमतीत विकला जात होता. बाजारात चोरुन लपून विकला जाणारा गुटखा तो देखील बंद होणार आहे. अनेक ठिकाणी गुटख्याची वाहतूक केली जाताना पकडले जात आहेत. धाडी पडत आहेत. गुटखा विक्रेत्यांवर मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल होत आहेत. प्रशासनापासून लपून गुटखा विकण्याचे प्रमाण खूप जास्त आहे. गुजरात, मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यातून सीमावर्ती भागाकडून गुटखा हा महाराष्ट्रात येत असतो. गुटख्याने तरुणांचे आरोग्य निश्चितच धोक्यात आले आहे. तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढत चालले आहेत. शासनाने गुटखा खाणे आणि विक्रीवर बंदी आणली असली तरी त्याची प्रशासनाकडून तशी अंमलबजावणी केली जात नव्हती. मुंढे यांच्यामुळे ग्रामीण भागातील गुटख्याचं वाढत जाणारं व्यसन नक्कीच कमी होण्यास मदत होईल असं बोलले जात आहे.

## पाणी जलसंवर्धनातून अधिक बळकट बनेल :किरण राव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झेरकाठी :** अनेक गावात उन्हाळ्याच्या काळामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना मोठी पायपीट करावी लागतात.मात्र पाणी फाऊंडेशनच्या विविध जलसंधारण उपक्रमांमुळे गावातल्या पाणी साठ्यात मोठी वाढ होईल, यातच गाव हे आणखी सुजलाम-सुफलाम बनले.असा विश्वास पाणी फाऊंडेशनच्या सह संस्थापिका सिने अभिनेत्री किरण राव यांनी व्यक्त केले.नगर तालुक्यातील आदर्शगाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या मांजरसुंबा गावी किरण राव यांनी सदिच्छा भेट दिली असता त्यावेळी त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की,पाणी संवर्धनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात परिवर्तन घडवून आणणाऱ्या पाणी फाऊंडेशन मार्फत विशेष प्रयत्न केले जात आहेत.पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून व गावकऱ्यांच्या एकजुटीचे आणि श्रमदानातून उभ्या राहिलेल्या विकासकामांचे कौतुक करत भविष्यातही जलसंवर्धन व शेतकरी गट ही चळवळ अधिक बळकट करण्याचे आवाहन केले.यावेळी आदर्श गावच्या सरपंच रूपाली कदम, उपसरपंच जालिंदर कदम, ग्रामसेविका सारिका वाळुंज, सहाय्यक कृषी अधिकारी सुविधा वाणी, पाणी फाऊंडेशनचे समन्वयक विक्रम पाठक, ग्रामस्थ विलास भुतकर, योगेश कदम नामदेव कदम, किरण कदम, प्रदीप कदम, बाळासाहेब कदम, बजरंग वरखडे,अर्चना कदम, छाया कदम यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी जालिंदर कदम, रंजन कदम आदीनी मनोगत व्यक्त केले.

## म्हैसगावात माजी विद्यार्थ्याचे स्नेहसंमेलन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

म्हैसगाव : राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथे इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन केदारेश्वर मंदिर परिसरात उत्साहात पार पडले. इयत्ता ११ वी १२ संगमनेर तालुक्यातील वरवंडी प्रवरा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षण पूर्ण केले.अनेक वर्षांनंतर सर्वच विद्यार्थी व विद्यार्थिनी एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा
दिला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत विविध विषयांवर चर्चा केली. तसेच एकमेकांच्या सध्याच्या शिक्षण, नोकरी व व्यवसायाबाबत माहितीची देवाणघेवाण करण्यात आली.कार्यक्रमा दरम्यान, मैत्रीचे बंध अधिक दृढ करण्याचा संकल्पही उपस्थितांनी व्यक्त केला. केदारेश्वर



मंदिराच्या निसर्गरम्य वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामुळे सर्वांमध्ये आनंदाचे वातावरण नवचैतन्य निर्माण झाले होते. यावेळी कार्यक्रमाच्या सुनिल दातीर व यशस्वी आयोजनासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांनी भविष्यातही अशा प्रकारे एकत्र येण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रम झाल्यानंतर सर्वांना एकत्र बसून जेवणाचा आस्वाद घेतला. यावेळी भाऊ पवार, संदिप पावडे, कमलेश विधाटे, जना जोरी, सुनिल दातीर, चेतन पोंदे, देवनाथ इले, गणेश सोनवणे, संदिप चोपडे, जानुकु वायळ, उषा घिगे, वर्षा देवके,आशा कांबळे,व इतर माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

## शिल्लेगांव पोलिसांचा गुन्हेगारास दणका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** लासूर स्टेशन परिसरातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन सराईत गुन्हेगारांना एक वर्षासाठी जिल्हाबाहेर हद्दपार केले आहे. या धडक कारवाईमुळे परिसरात कायद्याचा धाक निर्माण झाला असून याबाबत नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांनी १८ मे २०२६ रोजी महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत हा आदेश जारी केला. हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये लासूर स्टेशन येथील बाजार गल्ली परिसरातील अनिकेत संजय अनजीलम उर्फ साठे (वय २१) आणि आनंद उर्फ आदित्य बाबू जगधने (वय १९) यांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अनिकेत साठे हा टोळीचा प्रमुख असून आनंद जगधने त्याचा साथीदार आहे. शिल्लेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत या दोघांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या बेकायदेशीर आणि हिंसक कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सार्वजनिक शांतता,कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने ही कठोर कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

## शूटिंग बॉलमध्ये महाराष्ट्राचे सुवर्ण यश; समृद्धी पवळे ठरली स्टार खेळाडू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

राहुरी : आंध्र प्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय शूटिंग बॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या संघामध्ये राहुरी फॅक्टरी येथील समृद्धी महेश पवळे हिचा मोलाचा सहभाग राहिला. समृद्धी पवळे ही राहुरी फॅक्टरी येथील ज्येष्ठ नागरिक चांगदेव पवळे यांची



नात असून ती डी पॉल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता नववीत शिक्षण घेत आहे. राष्ट्रीय स्तरावरील या प्रतिष्ठित स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करताना समृद्धीने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर संघाला विजेतेपद मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. समृद्धीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## भाजपाचे माजी नगरसेवक बाळासाहेब गायकवाड यांचे निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गायकवाड कॉलनी येथील रहिवासी, भा ज पा सावेडी विभाग अध्यक्ष, माजी नगरसेवक बाळासाहेब उर्फ वसंतराव गायकवाड यांचे आज सोमवारी (दि.८) पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ६७ वर्षांचे होते. माजी नगरसेविका नीलिमा गायकवाड यांचे ते पती होत. त्यांचा पार्थिवावर सोमवारी दुपारी नगरच्या अमरधाम नालेगाव येथे अंत्यविधी करण्यात आले. अंत्यविधीस विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी,



कार्यकर्ते, नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचा मागे पत्नी, दोन मुली, एक मुलगा आणि चार भाऊ व तीन बहिणी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अत्यंत मनमिळाऊ, मोठा मित्रपरिवार होता. कायम हसतमुख स्वभावाने ते सर्वांना परिचीत होत. त्यांचा निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## नाशिक प्रकरणात 'टीसीएस' मलेशियाचा थेट संबंध

बोलत होते. निरुपम म्हणाले की, 'टीसीएस' प्रकरणी न्यायालयात दाखल झालेल्या आरोपपत्रांमधून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. पीडित हिंदू तरुणीचे धर्मांतर करण्यासाठी तिला सोशल मीडियावरील झाकीर नाईकचे व्हिडिओ दाखवून तिचे ब्रेनवॉश करण्याचा प्रयत्न आरोपींकडून सातत्याने करण्यात आला. या प्रकरणात मुख्य संशयित आरोपी निदा खान, दानिश शेख, तौफिक अत्तार हे तिघेच सूत्रधार नाहीत तर त्यांच्या पाठीशी मलेशिया आणि पाकिस्तानातील आंतरराष्ट्रीय टोळ्या कार्यरत असल्याचा आरोप निरुपम यांनी केला आहे. दानिश आणि तौफिक हे पिडितेला मलेशियाला पाठवणार होते, असेही आरोपत्रात म्हटले आहे. त्यामुळे आरोपींचे मलेशियाशी थेट संबंध होते, हे स्पष्ट दिसतंय असे निरुपम म्हणाले. याच मलेशियात फरार आरोपी झाकीर नाईक लपून बसला आहे. या झाकिर नाईकची संस्था किंवा एजन्सी महाराष्ट्रात कॉर्पोरेट्समध्ये काम करणाऱ्या हिंदु मुलींना धर्मांतरासाठी टार्गेट करत आहेत का, याबाबत तपास यंत्रणांनी चौकशी करायला हवी, अशी मागणी निरुपम यांनी केली.

निरुपम पुढे म्हणाले की, या प्रकरणातील आरोपी निदा खान ४० दिवस फरार होती. पोलीसांच्या शोध मोहीमेत ती छत्रपती संभाजी नगरमधील 'एमआयएम'चे नगरसेवक मतीन पटेल यांच्या घरी कुटुबांसह सापडली. यात निदा खान आणि नगरसेवक मतीन पटेल यांना पोलीसांनी अटक केली. पोलीस चौकशीत मतीन पटेल याने वारंवार इम्तियाज जलीलचे नाव घेतले होते. जलील हे एमआयएमचे महाराष्ट्राचे प्रमुख आणि माजी खासदार आहेत. ठाणे महापालिकेच्या मुंब्रा प्रभागात निवडून आलेली 'एमआयएम'ची नगरसेविका मुंब्र्याला हिरवे करणार असा दावा करते. यावेळी तिच्या सोबत असलेले इम्तियाज जलील तिथं केवळ मुंब्राच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्र हिरवा करणार असे जाहीर वक्तव्य करुन वाद निर्माण करतात. त्यामुळे टीसीएस प्रकरणात 'एमआयएम'चा सहभाग असू शकतो, असा आरोप निरुपम यांनी यावेळी केला. तपास यंत्रणांनी 'एमआयएम'च्या नेत्यांनी सखोल चौकशी केली पाहिजे, अशी मागणी निरुपम यांनी केली.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

मंगवार दि . ९ जून २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १४६<br>१२८<br>१०० | १-० | १३०<br>१२७<br>५५० | १२-७०-८४-०९-३५ |

### कल्याण

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १२९<br>४८०<br>६६० | २-७ | १२४<br>१७९<br>११५ | २६-९७-४१-०३-७५ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १४५<br>२८०<br>४६० | ०-६ | १२३<br>४४८<br>८८० | ०२-४६-५३-१८-६९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME GANIMIYA CHOTUSAHEB SAYYAD (IN PASSPORT NO- M8127994)( BEFORE NAME ) TO NEW NAME AS GANIBHAI CHOTTUBHAI SAYYAD' (AADHAR NO. 4959 1421 7428) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLICSHRIRAMPUR
PLACE: SHRIRAMPUR
DATE : 08/06/2026

## शुभ लाभ

| | |
|---|---|
| 09/03/2026 | 2 2 1 8 5 8 2 1 3 1 |
| To | 3 16 4 6 56 8 7 05 8 4 43 4 3 09 3 |
| 13/03/2026 | 6 0 8 0 8 9 8 8 4 5 |
| 16/03/2026 | 4 8 2 3 4 4 1 1 6 3 |
| to | 5 56 9 0 21 8 6 02 9 2 02 3 7 38 7 |
| 20/03/2026 | 6 9 0 0 0 9 7 8 0 8 |
| 23/03/2026 | 6 3 4 1 5 7 1 2 3 1 |
| to | 8 34 5 5 46 7 6 03 8 3 46 4 3 64 6 |
| 27/03/2026 | 9 6 5 8 9 8 0 0 0 7 |
| 30/03/2026 | 2 1 1 1 2 1 1 1 1 2 |
| to | 8 90 3 3 87 6 7 97 1 1 12 5 6 66 5 |
| 03/04/2026 | 9 6 4 0 0 9 9 6 9 9 |
| 06/04/2026 | 1 2 1 7 1 4 3 1 1 4 |
| to | 3 70 2 4 02 7 3 98 7 5 82 5 2 78 6 |
| 10/04/2026 | 3 6 5 8 5 7 0 6 4 8 |
| 13/04/2026 | 5 1 1 6 2 5 1 8 2 1 |
| to | 6 06 5 4 43 7 3 45 0 3 77 9 6 85 4 |
| 17/04/2026 | 9 0 9 0 9 0 3 0 0 0 |
| 20/04/2026 | 5 1 8 4 1 3 5 3 3 3 |
| to | 7 00 2 8 58 5 2 53 5 5 71 8 4 68 7 |
| 24/04/2026 | 8 7 9 9 2 5 7 0 9 8 |
| 27/04/2026 | 3 1 4 7 1 1 6 1 6 2 |
| to | 5 63 2 4 85 8 6 71 2 7 29 9 8 27 5 |
| 01/05/2026 | 8 0 0 0 0 8 9 9 8 0 |
| 04/05/2026 | 1 3 1 6 2 2 2 2 2 2 |
| to | 7 71 9 4 34 8 3 48 7 4 25 5 4 66 5 |
| 08/05/2026 | 9 9 8 0 9 9 6 8 0 9 |
| 11/05/2026 | 5 2 3 2 6 2 1 1 4 1 |
| to | 6 79 7 7 04 3 0 68 3 9 01 2 7 85 5 |
| 15/05/2026 | 6 0 0 9 0 3 0 8 7 9 |
| 18/05/2026 | 8 4 5 1 1 1 7 4 2 2 |
| to | 9 79 5 6 96 7 4 22 2 8 30 8 8 93 5 |
| 22/05/2026 | 0 0 8 8 7 9 8 8 9 6 |
| 25/05/2026 | 5 2 3 1 8 4 1 2 4 5 |
| to | 6 11 9 4 37 3 9 78 6 9 05 5 6 06 5 |
| 29/05/2026 | 0 0 6 3 0 8 0 8 0 6 |
| 01/06/2026 | 4 1 9 1 2 5 1 |
| to | 4 89 3 9 80 2 6 82 7 21 |
| 05/06/2026 | 0 5 0 7 0 0 8 |

# सीना नदीच्या सौंदर्यीकरणासाठी अतिरिक्त निधी : पालकमंत्री

नदीचे रुंदीकरण, खोलीकरण व सुशोभीकरण कामाची पालकमंत्री विखे पा. व आ. जगताप यांच्याकडून पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शहराच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या, पर्यावरणीय समतोलाला बळकटी देणाऱ्या आणि भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक वारसा जपणाऱ्या महत्त्वाकांक्षी सीना नदी रुंदीकरण, खोलीकरण व सुशोभीकरण प्रकल्पाची पाहणी पालकमंत्री विखे पाटील आणि आ. संग्राम जगताप यांनी केली. शहरातून तब्बल १४ किलोमीटर वाहणाऱ्या सीना नदीचे संपूर्ण रूपांतर करण्याचा संकल्प प्रशासनाने केला असून पहिल्या टप्प्यात तीन किलोमीटर नदीचे रुंदीकरण आणि खोलीकरणाचे काम वेगाने सुरू आहे.

या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, गणेश भोसले, भगवान फुलसौंदर, अनिल बोरुडे, ॲड. अभय आगरकर, अनिल मोहिते, नगरसेवक मनोज कोतकर, विकी जगताप, अमोल गाडे, किशोर डागवले, निखिल वारे, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, गोरख पडोळे, दत्ता गाडळकर, अनिल ढवण, ऋग्वेद गंधे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीचे सुशोभीकरण व पुनरुज्जीवन व्हावे यासाठी आ. संग्राम जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आता नदीच्या सौंदर्यीकरणासाठी स्वतंत्र आणि व्यापक प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवावा. त्यासाठी आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल.

सीना नदी ही केवळ जलवाहिनी नसून अहिल्यानगर शहराची मानबिंदू आहे. अनेक वर्षांच्या दुर्लक्षामुळे आणि वाढत्या अतिक्रमणांमुळे नदीचे मूळ स्वरूप नष्ट होऊ लागले होते. काही ठिकाणी तर नदीचे पात्र अस्तित्वात आहे की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे नदीचे पुनरुज्जीवन ही काळाची आहे. आ. जगताप यांनी यासाठी पुढाकार घेतल्यामुळे आज प्रत्यक्ष काम सुरू झाले आहे. पहिल्या टप्प्यात तीन किलोमीटर अंतरातील काम सुरू असून पुढील काळात संपूर्ण १४ किलोमीटर नदीचे रुंदीकरण, खोलीकरण व अतिक्रमण निर्मूलनाचे काम टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आसून जलसंपदा विभागाच्या माध्यमातून या संपूर्ण प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. १४ किलोमीटर नदीपात्रातील अतिक्रमणे हटविणे, रुंदीकरण आणि खोलीकरणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून आवश्यक ती कारवाई केली जाईल. महापालिका निवडणुकीच्या काळात नागरिकांना सीना नदीच्या विकासाचे आश्वासन दिले होते. आज त्या आश्वासनाची प्रत्यक्ष पूर्तता होताना दिसत आहे. शहरातील अनेक नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह अतिक्रमणांमुळे थांबला असून त्यामुळे पावसाळ्यात पाणी साचणे, दुर्गंधी निर्माण होणे व आरोग्याच्या समस्या वाढणे अशा अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे शहरातील नाले अतिक्रमणमुक्त करून पुन्हा प्रवाही केले जाणार आहेत. शहरातील सांडपाण्यावर शंभर टक्के प्रक्रिया करूनच ते नदीमध्ये सोडणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षणासाठी ही अत्यंत महत्त्वाची बाब असून त्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील. या कामासाठी अधिक निधीची आवश्यकता भासल्यास तो उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**१४ किलोमीटर वाहणाऱ्या सीना नदीचे बदलणार रूप; पहिल्या टप्प्यात तीन किलोमीटर काम प्रगतीपथावर**

**अतिक्रमणमुक्त, स्वच्छ आणि प्रवाही सीना नदीसाठी प्रशासन सज्ज; नगरकरांना मिळणार नवे पर्यटनस्थळ**

## द•ख•ल

### पत्रकार भूषण देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आज सभा



**अहिल्यानगर :** ज्येष्ठ पत्रकार व इतिहास अभ्यासक भूषण देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्व पत्रकार व सीएसआरडी यांनी मंगळवारी दुपारी तीन वाजता श्रद्धांजली सभेचे आयोजन केले आहे. सीएसआरडी महाविद्यालयातील सभागृहात ही श्रद्धांजली सभा होणार आहे. शहरातील सर्व नागरिकांना सभेत सहभागी होता येणार आहे. देशमुख यांनी दीर्घकाळ अहिल्यानगर शहरात पत्रकारिता केली. तसेच अहिल्यानगर शहर व जिल्ह्याचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी सातत्याने विविध उपक्रम राबवले. स्नेहालय या स्वयंसेवी संस्थेच्या रेडिओ नगरचे ते संचालक होते.

### तोतया पोलिसांचा सुळसुळाट ज्येष्ठ नागरिकाला ७० हजारांना लुटले

**अहिल्यानगर :** शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत तोतया पोलिसांनी धुमाकूळ घातला असून, एका ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. पाईपलाईन रोडवरील अष्टविनायक कॉलनीच्या कमानीजवळ ही घटना घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गणपतराव विष्णु पंदारे (वय ८४, रा. अष्टविनायक कॉलनी, पाईपलाईन रोड) हे नेहमीप्रमाणे सायंकाळी फिरण्यासाठी बाहेर पडले होते. ते अष्टविनायक कॉलनीच्या कमानीजवळ आले असता, पाठीमागून दुचाकीवर दोन अनोळखी इसम आले. त्यांनी गणपतराव यांना थांबवून, आम्ही पोलीस आहोत, तुमच्या गळ्यातील चैन आणि हातातील अंगठ्या काढून द्या, असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. घाबरलेल्या गणपतराव यांनी स्वतःच्या गळ्यातील ३० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन आणि ४० हजार रुपयांच्या दोन सोन्याच्या अंगठ्या काढून दिल्या. त्यानंतर त्या भामट्यांनी खोट्या अंगठ्या गणपतराव यांच्या हातात देऊन गणेश बुक एजन्सीसमोरून दुचाकीवरून पळ काढला. काही वेळाने हा प्रकार फसवणुकीचा असल्याचे लक्षात आल्यानंतर परिसरात गर्दी जमली. एका नागरिकाने या घटनेची माहिती गणपतराव यांच्या मुलाला दिली. याप्रकरणी गणपतराव पंदारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून तोफखाना पोलिसांनी दोन अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यातील एका आरोपीचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून त्याने पांढरा शर्ट घातला होता. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार गिरी करत आहेत.

### कृपाल आश्रमात धाडसी चोरी दानपेटी फोडून रोकड लंपास

**अहिल्यानगर :** शहरातील मिस्किन नगर भागात असलेल्या कृपाल आश्रम आध्यात्मिक संस्थेमध्ये अज्ञात चोरट्याने धाडसी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्याने आश्रमाच्या दरवाजाचा कडीकोयंडा आणि कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर आश्रमातील लाकडी दानपेटी फोडून त्यामधील १७,३०० रुपयांची रोख रक्कम चोरून नेली आहे. याप्रकरणी आश्रमाचे सचिव सुशिल रामलाल बजाज यांनी पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुशिल बजाज आणि राकेश शिवकुमार छाबरिया यांनी घटनेच्या आदल्या रात्री दानपेटीतील रक्कम तपासून ती पुन्हा पेट्यात सुरक्षित ठेवली होती. त्यानंतर आश्रम व्यवस्थित बंद करण्यात आला होता. दुसऱ्या दिवशी पहाटे कमलेश छाबरिया हे आश्रम उघडण्यासाठी गेले असता, त्यांना दरवाजाचे कुलूप आणि कडीकोयंडा तुटलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांनी तातडीने या घटनेची माहिती सुशिल बजाज यांना दिली. सर्वांनी आत जाऊन पाहिले असता दानपेटी फुटलेली होती आणि त्यातील सर्व रोकड गायब होती. आश्रमातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासले असता, रात्री पावणेतीन ते तीन वाजेच्या सुमारास एक अनोळखी चोरटा आश्रमात शिरल्याचे आणि चोरी करताना स्पष्टपणे दिसून आले. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे आणि महिला पोलीस अंमलदार अनिता मरभळ करत आहेत. या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलीस चोरट्याचा शोध घेत आहेत.

### शिक्षक सेवा संघ-मायभूमी फौंडेशनचा भव्य सन्मान सोहळा संपन्न

**खरवंडी कासार :** शिक्षक सेवा संघ व मायभूमी फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा भव्य-दिव्य सन्मान सोहळा आणि श्री मल्हारी विलास खेडकर सर यांच्या सेवापूर्ती निमित्त आनंदोत्सव ६ जून रोजी श्री संत भगवान विद्यालय, श्रीक्षेत्र भगवानगड येथे संपन्न झाला. श्रीक्षेत्र भगवानगडाचे प्रधानाचार्य ह.भ.प. नारायण स्वामीजी महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला पाथर्डी-शेवगावच्या आमदार मा. श्रीमती मोनिका राजीवजी राजळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. राष्ट्रसंत भगवान बाबांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विश्वस्त पांडुरंग आंधळे यांनी प्रास्ताविकात शिक्षक सेवा संघाच्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक, यूपीएससी-एमपीएससी अधिकारी, प्रगतशील शेतकरी, संत-महंत, पुरस्कारप्राप्त समाजसेवक, इस्त्रो-नवोदयसाठी निवड झालेले विद्यार्थी आणि एसएससी-एचएससीमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सेवापूर्ती झालेल्या श्री मल्हारी विलास खेडकर सर यांचा आ. मोनिका राजळे यांच्या हस्ते आणि अध्यक्ष स्वामीजींच्या प्रमुख उपस्थितीत सपत्नीक सन्मान झाला. गेल्या ३५ वर्षांत शिक्षण, समाजसेवा, पर्यावरण, अध्यात्म या क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना आतापर्यंत १०७ पुरस्कारांनी गौरवण्यात आले असल्याची माहिती अध्यक्षांनी दिली.

# आदिवासी भिल्ल कुटुंबांना घरकुल, शेतीसाठी जागा द्या

‘एकलव्य’ संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** पाथर्डी तालुक्यातील मिरी गावातील भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजातील कुटुंबांना राहण्यासाठी तसेच उदरनिर्वाहासाठी शेती करण्याकरिता शासनाची जागा उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी एकलव्य भिल्ल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

एकलव्य भिल्ल संघटनेचे संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजंता गोलवाड तथा नाशिक विभागाचे सभापती शिवाजी ढवळे व चेअरमन अनिल गोलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी सयाजी पवार, सविता पवार, राजेंद्र माळी, आसराबाई माळी, रमेश पवार, सुनीता पवार, सोनू दळवी, अनिता दळवी, गंगा पवार, शहाजी पवार, शहादेव पवार, अंकुश पवार, जिजाबाई पवार, बाबासाहेब माळी, भाऊसाहेब पिंपळे, दुर्गा पिंपळे, रामकिसन माळी, शत्रुघ्न माळी, सोनाली माळी, सुनीता माळी, मनीषा माळी, कचरू माळी, कृष्णा माळी, मीरा माळी, विक्रम माळी, आशाबाई माळी, शरद पवार, परमेश्वर पवार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मिरी गावात आदिवासी भिल्ल समाजाची अनेक कुटुंबे वास्तव्यास असून त्यांचा प्रमुख व्यवसाय मोलमजुरी आहे. मात्र या कुटुंबांकडे स्वतःची शेती किंवा राहण्यासाठी जागा नसल्याने त्यांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

# महिलांच्या सुरक्षिततेशी तडजोड सहन केली जाणार नाही

आरोपीवर कठोर कारवाई करा : जगताप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** सावेडी उपनगरामध्ये घरफोडी आणि महिलांच्या छेडछाडीच्या गंभीर प्रकरणातील आरोपी विजय सुनील यलन याला तोफखाना पोलीस ठाण्याच्या पथकाने अटक केल्याबद्दल गुणे आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांची भेट घेऊन त्यांचे व संपूर्ण पोलीस पथकाचे अभिनंदन केले. तसेच या प्रकरणातील आरोपीवर कठोर आणि कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, अभिजीत खोसे, सुशील बजाज आदी उपस्थित होते.

सावेडी परिसरात घडलेल्या घरफोडी आणि महिलांच्या छेडछाडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः महिला आणि कुटुंबीयांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर तोफखाना पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली. या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

यावेळी बोलताना सचिन जगताप म्हणाले की, महिलांच्या सुरक्षिततेला आणि नागरिकांच्या संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले पाहिजे. सावेडी परिसरात घडलेली घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असून अशा प्रकारचे गुन्हे समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण करतात.

# जागतिक सायकल दिनानिमित्त शहरात सायकलिंगचा जल्लोष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर :** जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने आणि इन्फिनिटी सायकलिंग अकॅडमी व बाईक टेक पॉईंट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ७ जून) राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धा उत्साहात पार पडली. यासोबतच महिलांसाठी विशेष असलेल्या ‘अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग’ देखील मोठ्या उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील नामांकित महिला व पुरुष सायकलपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेत सायकलिंगचा रोमांचक अनुभव दिला. जिल्ह्यातील सायकलपटूंच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण क्रीडामय झाले होते.

पेमराज सारडा महाविद्यालय मैदानापासून स्पर्धेला प्रारंभ झाला. महिलांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये संधी मिळावी आणि सायकलिंग क्षेत्रात त्यांचे प्रोत्साहन वाढावे या उद्देशाने खेलो इंडिया अंतर्गत सलग दुसऱ्या वर्षी या लीगचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ६ वाजता सारडा महाविद्यालय मैदानावरून ‘स्लो झोन’च्या माध्यमातून स्पर्धेला सुरुवात झाली. पत्रकार चौक, डीएसपी चौक, स्टेट बँक चौक, चांदणी चौक, सोलापूर चौक मार्गे टँक म्युझियमपर्यंत सायकलपटूंनी प्रवास केला. टँक म्युझियमपासून मुख्य स्पर्धेला सुरुवात झाली. पुरुषांची स्पर्धा वाळुंज, चांदबिबी बायपास चौक मार्गे पुन्हा टँक म्युझियम येथे समाप्त झाली.

**स्पर्धेतील विजेते**

मास्टर गट (४० कि.मी.) प्रथम- खुद्दुस शेख, द्वितीय- रवी राजेश, तृतीय- हर्षल खांडवे, चतुर्थ - अकरम देवकाते, पाचवा- किरण पवार, सहावा- प्रविण पाटील. मेन्स गट (४० कि.मी.) प्रथम- सुर्या थट्टू, द्वितीय- सिद्धेश पाटील, तृतीय- सुदर्शन देढगावकर, चौथा- रिहान शेख, पाचवा- अश्विनी मर्दे कर, सहावा उमेश बंजारा १८ वर्षांखालील गट (२० कि.मी.)- प्रथम- मयंक पाखरे, द्वितीय- शुंभुराज यादव, तृतीय- आर्यन जाधव, चौथा- राजवर्धन शिंदे, पाचवा- शर्व वाळके

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शिवछत्रपती पुरस्कार विजेते गणेश पवार, राष्ट्रीय पदकविजेते गौरव सिंह, राष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग प्रशिक्षक संकल्प थोरात, श्रीनिवास लोंढे, प्रा. साईनाथ थोरात, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव प्रा. संजय साठे, संभाजी मोहिते लाला कांबळे, वैभव भोर, सागर करांडे, राष्ट्रीय पदकविजेते ओम करांडे, बाळासाहेब दीक्षित, वासुदेव पांढरे, अनिल भवर, अशोक गाडेकर, शिवनाथ मोहिते, सरपंच विष्णू थोरात, किरण बोयणे, पांडुरंग भोजने, विकास भालेराव, मोबिन शेख तसेच सिंहगड सायकलिंग फाउंडेशन (पुणे)चे नितीनजी थोपटे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेचे पंच म्हणून प्रा. संजय साठे, प्रा. कल्पेश भागवत, प्रा. शैलेश गवळी, प्रा. रावसाहेब बाबर, प्रा. साईनाथ थोरात, क्रीडा अधिकारी विशाल गर्जे, प्रा. अविनाश काळे, प्रा. संजय धोपावकर आणि प्रा. दिनेशल भालेराव यांनी काम पाहिले. स्पर्धेसाठी नरेंद्र फिरोदिया (आय लव्ह नगर), शौनक खराडे, नदीम सय्यद (हुंडेकरी लॉन्स), प्रताप (काका) ढाकणे(ममता इंटरप्राईजेस), दत्ता आढाव, सचिन राणे (व्हिजन नेक्स्ट), लॉरेन्स स्वामी(बालाजी इंटरप्राईजेस), शुद्धायू लाकडी तेलघाणा, अनमोल रेसीडेन्सी, अभिनंदन भन्साळी,(अवित्री बाइक्स इंडिया), पॉलीगोन इंडिया, सिंहगड फाऊंडेशन (पुणे), झावरेश नगरवाला, माजी सायकलिस्ट लाला कांबळे आणि यश ससे यांचे प्रायोजकत्व लाभले.

# मोहरम उत्सवासाठी प्रशासनाने तातडीने पूर्वतयारी करावी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

आय लव्ह अहमदनगर फौंडेशनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अहिल्यानगर :** शहरातील ऐतिहासिक, धार्मिक आणि सर्वधर्मसमभावाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या मोहरम (सवारी) उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक नागरी सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि प्रशासनाच्या पूर्वतयारीबाबत आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले. उत्सव काळात उद्भवणाऱ्या विविध समस्या, भाविकांच्या सुरक्षिततेचे प्रश्न तसेच प्रशासनाने तातडीने करावयाच्या उपाययोजनांकडे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, फैरोज पठाण, दानिश शेख, सहारा सोशल क्लबचे अध्यक्ष अजीम राजे, शहाबाज शेख, साजिद जहागीरदार, अकबर अली शेख यांच्यासह मुस्लिम समाजातील युवक उपस्थित होते. शहरात सुमारे ४५० वर्षांहून अधिक काळाची मोहरम उत्सवाची गौरवशाली परंपरा लाभली आहे. शहरातील मोहरम उत्सव हा त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक परंपरा, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी देशभरात प्रसिद्ध आहे. कोठला, सर्जेपुरा, हवेली, जुने शहर, कापड बाजार, दिल्लीगेट आदी भागांतून निघणाऱ्या सवाऱ्यांच्या दर्शनासाठी तसेच लंगर आणि सरबत वाटपच्या सेवांमध्ये सहभागी होण्यासाठी लाखो भाविक शहरात दाखल होत असतात.

या ऐतिहासिक आणि संवेदनशील उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी आणि भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मिरवणुकीच्या प्रमुख मार्गांवरील खड्डे डांबरीकरण करून तातडीने बुजवावेत, अतिक्रमणे हटवावीत तसेच अनधिकृत पार्किंगवर कारवाई करावी.

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी
M डागा | शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अ.नगर
७५८८११५१५७ | ९८२२०८१४४०

# शहरातील ओढे-नाले बुजविणाऱ्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा : आ. जगताप

विकासकामांना अडथळा ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांची शासनाकडे तक्रार ; नागरिकांची गैरसोय तातडीने दूर करा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** राज्य शासनाच्या माध्यमातून शहरातील विकास आराखड्यातील (डीपी) रस्त्यांच्या कामांसाठी तब्बल दीडशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. शहराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्था, नियोजनबद्ध विकास आणि नागरिकांच्या सोयीसाठी ही कामे सुरू करण्यात आली. मात्र काही रस्त्यांची कामे अद्याप प्रलंबित आहेत तर काही रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यासाठी महापालिकेच्या नगररचना विभागाने वेळेत लाईनआऊट देणे आणि अतिक्रमण विभागाने अडथळे दूर करणे गरजेचे असताना संबंधित विभागांकडून होत असलेल्या हलगर्जीपणामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होत असल्याची तीव्र नाराजी आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केली.

आ. संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून सुरू असलेल्या एकविरा चौक ते तपोवन रोड दरम्यानच्या काँक्रिटीकरण रस्ता कामाची पाहणी करण्यात आली. यावेळी आ. संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, महेश तवले, सुनील त्रिंबके ऋग्वेद गंधे, कुमारसिंह वाकळे, किशोर डागवले, अविनाश घुले, गणेश कवडे, महेश लोंढे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, मनोज पारखे, इंजिनिअर आदित्य बल्लाळ, इंजिनिअर गणेश गाडळकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले की, शहरातील विकासकामे ही पुढील वीस वर्षांचा विचार करून कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली जात आहेत. मात्र महापालिकेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कारभारामुळे ही कामे रखडत आहेत. रस्ते विकासासाठी आवश्यक असलेले लाईनआऊट वेळेत दिले जात नाहीत, अतिक्रमण हटविले जात नाही आणि त्यामुळे ठेकेदारांना काम करताना अडचणी येतात. काही ठिकाणी कामे सुरू होतात आणि अचानक थांबतात. यामुळे नागरिकांना वाहतुकीचा त्रास सहन करावा लागत असून व्यापाऱ्यांनाही आर्थिक फटका बसत आहे. ते पुढे म्हणाले की, ठेकेदारांनी लाईनआऊट मिळाल्याशिवाय काम सुरू करू नये आणि एकदा काम सुरू केल्यावर ते अर्धवट सोडू नये. शहरातील सर्व प्रलंबित रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करून नागरिकांसाठी खुली करण्यात यावीत. महापालिका अतिक्रमण विभाग आणि नगररचना विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कारभारामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होत असल्याने त्यांच्या विरोधात शासनाकडे कारवाईची मागणी करण्यात येणार आहे. आ. संग्राम जगताप यांनी यावेळी गंभीर आरोप करत सांगितले की, शहरातील अनेक ओढे आणि नाले बुजविण्याच्या प्रकारांना काही अधिकाऱ्यांचे अप्रत्यक्ष संरक्षण मिळत आहे.

**सायटेशन नोटीस**

प्रो. फी. जमा.रु.
पान नं.
दि.०८/०६/२०२६

पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात

चौ.अ.नं. ३२/२०२६

अर्जदार
श्री. सुदाम दगडु तांदळे रा चिंचपुर इजदे ता. पाथर्डी जि.अहिल्यानगर
सामनेवाला
ग्रामपंचायत कार्यालय चिंचपुर इजदे, ता. पाथर्डी जि.अहिल्यानगर

सदर अर्जदार हा मौजे चिंचपुर इजदे ता. पाथर्डी जि.अहिल्यानगर येथील रहिवाशी आहेत. सदर अर्जदार यांचे वडील नामे कै. दगडू गंगाराम तांदळे यांचा मृत्यु मौजे चिंचपुर इजदे ता. पाथर्डी जि.अहिल्यानगर येथे १०-०२-१९९७ रोजी झालेला आहे. त्यानंतर मृत्यु नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय चिंचपुर इजदे येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय चिंचपुर इजदे यांचे कार्यालयात मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे चिंचपुर इजदे मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (मृत्यु दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे मृत्यु दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय चिंचपुर इजदे ता. पाथर्डी येथील मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत चिंचपुर इजदे ता. पाथर्डी येथे जावुन मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता मृत्युची नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्युची नोंद नसलेबाबत ३०- ०४-२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्माच्या १ वर्षाच्या आत मध्ये मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय चिंचपुर इजदे ता.पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थतीमध्ये सदर अर्जदार यांचे मृत्यु नोंद मृत्यु रजिस्टरला होणे न्यायाचे व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदारास त्यांचे वडील नामे कै. दगडू गंगाराम तांदळे मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दिनांक ८/ ६/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का

हुकमावरुन

सही/-
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी पाथर्डी

## द • ख • ल

### प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेच्या माध्यमातून तरुणांना संधी

**पुणे :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना २०२६ च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून देशभरात ३१ हजार ४८० पेक्षा अधिक इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. या योजनेंतर्गत १८ ते २५ वर्षे वय, भारतीय नागरिकत्व असलेले, किमान १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा किंवा पदवीधर उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. पूर्णवेळ नोकरी किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र असतील. जे उमेदवार ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेत आहे ते उमेदवार पात्र आहेत. इंटर्नशिपचा कालावधी ६ ते ९ महिने असून दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार आहे. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल.प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेमध्ये पुणे जिल्ह्यामधील ज्युबिलंट फूडवर्क्स लि. (१९२), बजाज ऑटो लि. (३०९), भारत फोर्ज (७), रिलायन्स इंडिस्ट्रीज लि. (३३), टेक महिंद्रा (४२), स्कोडा ऑटो व्होल्क्सवॅगन इंडिया प्रा. लि. (१९), इमामी लि. (१५), फिनोलेक्स केबल्स लि. (६०), कॉग्नीझंट टेक्न्कॉलॉजी सोल्युशन्स इं. प्रा. लि. (१४), पिरामल फार्मा लि. (१) आदी नामांकित कंपन्यांमध्ये रिक्तपदांसाठी उमेदवारांना इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध आहे. तरी या कंपनीमध्ये अर्ज करण्यासाठी मर्यादित कालावधी असल्यामुळे र्हीींिीं://िळपींशॲपीहळ.ािर.सेीं.ळप या पोर्टलवर जाऊन नोंदणी करावी व या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ पुणे या कार्यालयास प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र. ०२०-२६,१३३६०६, वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बैठकीत तीन प्रकरणांवर सुनावणी

**पुणे :** विभागीय आयुक्त शीतल तेली उगले यांच्या अध्यक्षतेखाली पुणे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या तिमाही बैठकीत पुणे जिल्ह्यातील ३ प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. यावेळी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, डॉ. स्वाती देशमुख, समितीचे सदस्य सचिव तथा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक तीन महिन्यातून एकदा त्या महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक घेण्यात येते. या बैठकीत तीन महिन्यांत समितीकडे आलेल्या तक्रारी व त्यावर केलेल्या उपाययोजनांबाबत आढावा घेण्यात आला. बैठकीत अर्जदारांना तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना व अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन श्रीमती तेली उगले यांनी सुनावणी घेतली.

### आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहितांसाठी पुण्यात सुरक्षागृह

**पुणे :** आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी पुणे जिल्हा प्रशासनाने विशेष सुरक्षागृह व विशेष कक्षाची स्थापना केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या या निर्णयामुळे जीवितास किंवा सुरक्षिततेस धोका निर्माण झालेल्या जोडप्यांना तातडीने सुरक्षित निवारा आणि कायदेशीर संरक्षण उपलब्ध होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने शक्तीवाहिनी विरुद्ध भारत सरकार व इतर (रिट याचिका क्र. २३१/२०१०) प्रकरणात २७ मार्च २०१८ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार देशातील प्रत्येक जिल्ह्यात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या संरक्षणासाठी विशेष कक्ष आणि सुरक्षागृहे स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सूचनांनुसार पुणे जल्हा प्रशासनाने ही व्यवस्था कार्यान्वित केली आहे. या व्यवस्थेमध्ये जोडप्यांच्या संरक्षणासाठी प्रतिबंधात्मक, उपचारात्मक आणि दंडात्मक उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. सुरक्षागृहासाठी प्राधान्यक्रमानुसार त्रिस्तरीय व्यवस्था करण्यात आली असून, प्रथम जिल्ह्यातील मुख्य शासकीय विश्रामगृहात विशेष कक्ष राखीव ठेवला जाणार आहे. तेथे जागा उपलब्ध नसल्यास जिल्हा अथवा तालुका स्तरावरील रिक्त शासकीय निवासस्थान उपलब्ध करून दिले जाईल.

# बेलापूर बुद्रुक येथील एका शाळेशेजारील खत गोदाम हटवा

## भारतीय लहुजी सेनेची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर : तालुक्यातील बेलापूर येथील एका शाळेजवळील असलेल्या खत साठवणूक गोदामाने विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याचा आरोप करत भारतीय लहुजी सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्याना निवेदन सादर करण्यात आले आहेत. याच, निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जनवेश ट्रेडर्स या नावाने कार्यरत असलेल्या खत गोदाम शाळेच्या अगदीजवळ आहेत. तेथेच मोठ्या प्रमाणात खताचा साठा केला जात आहेत. सदरचे गोदाम जुन्या व जीर्ण अवस्थेतील इमारतीत सुरू असल्याने आग अथवा इतर आपत्तीजन्य घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. यापूर्वीही, संबंधित विभागाकडे तक्रारी करण्यात आल्याचे तसेच विविध प्रसारमाध्यमांद्वारे हा विषय प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. भारतीय लहुजी सेनेने प्रशासनाकडे गोदामाची तात्काळ पाहणी करून त्यावरील कायदेशीर स्थिती तपासावी, अग्निसुरक्षा व अन्य आवश्यक परवानग्यांची पडताळणी करावी, तसेच सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अयोग्य आढळल्यास सदर गोदाम बंद करून ते एमआयडीसी अथवा अन्य योग्य औद्योगिक क्षेत्रात स्थलांतरित करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

# देवळाली प्रवरात दुसरा बिबट्याही जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहूरी :** तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील वरखडे वस्तीवर दुसरा बिबट्याही जेरबंद करण्यात वनविभागाला सोमवारी यश मिळाले.देवळाली प्रवरा येथील साई मंदिरलगत असलेल्या प्रभाकर वरखडे यांच्या वस्तीवर चार दिवसापूर्वीच बिबट्याने एक शेळी जखमी केली.आंतरराष्ट्रीय खेळाडू आप्पासाहेब ढूस यांनी वनविभागाला तात्काळ पिंजरा लावण्याची मागणी करत येथे दोन दिवस पिंजरे लावण्यात आले होते. त्यामुळे वरखडे वस्तीवर नागरिकांना रात्रभर जागे राहून आपल्या मुलांचे व जनावरांचे रक्षण करावे लागत होते. वनविभागाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने शेवटी आप्पासाहेब ढूस यांनी सोशल मीडियाला बिबट्या दिसत असल्याचा ि ह ि ड अ ा तयार करून वनाधिकाऱ्यांनी कारवाई न केल्याने जर, काही जीवितहानी झाली तर,यास अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा दिल्यानंतर (दि. ०६) जून रोजी वनविभागाकडून तातडीने पिंजरा लावण्यात आला होता.त्याचदिवशी पिंजऱ्यामध्ये एक बिबट्या जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. यावेळी वनविभागास प्रभाकर वरखडे, भारत मुसमाडे, डॉ. ज्ञानदेव वरखडे, सचिन वरखडे, अनिल दळवी, योगेश वरखडे, किशोर दळवी, बालू वाबळे, रवी कदम, गणेश भोसले, पोपट दले, दीपक हापसे, सौरव वरखडे, भानुदास वरखडे, बापू वरखडे, दत्तात्रय वरखडे, संकेत मोरे, विजू साठे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक वनविभागाला मदत केली.

# जेजुरी गडावर पुजाऱ्याला मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या श्री क्षेत्र जेजुरी येथील खंडोबा मंदिर परिसरात पुजाऱ्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची धक्कादायक घटना रविवारी दुपारी घडली. याप्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात कामशेत येथील तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेमुळे देवस्थान परिसरात खळबळ उडाली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेजुरी गडावरील मुख्य मंदिर परिसरात दुपारी साडेतीनच्या सुमारास पुजारी अमर महादेव बारभाई (वय ३८) आणि आरोपी यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपींनी मंदिर परिसरात आरडाओरडा व शिवीगाळ करत अमर बारभाई यांना घेरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी उपस्थित इतर पुजारी व सेवाधाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून वाद शांत केला. मारहाणीनंतर आरोपींनी पुजाऱ्याला धमक्याही दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पुजारी अमर बारभाई यांनी जेजुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर राजू आनंदा नवले, हर्षद राजू नवले आणि वरनीत राजू नवले (रा. कामशेत, ता. मावळ, जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तिघेही एकाच कुटुंबातील असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११५(२), ११७(२), ३५१(२), ३५१(३), ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. स्वेच्छेने दुखापत करणे, गंभीर दुखापत पोहोचवणे, गुन्हेगारी धमकी देणे, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे तसेच समान हेतूने एकत्रितपणे गुन्हा करणे अशा आरोपांचा त्यामध्ये समावेश आहे.

खंडोबा मंदिर हे राज्यातील प्रमुख धार्मिक स्थळांपैकी एक असून दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येथे येतात. अशा पवित्र ठिकाणी पुजाऱ्याला मारहाण झाल्याची घटना समोर आल्याने भाविक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्याची मागणीही यानिमित्ताने पुढे आली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास जेजुरी पोलीस ठाणे – सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार नंदकुमार पिंगळे करीत आहेत. पोलिसांकडून मंदिर परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

# वरुडेत एकाचा गळा चिरून हात्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** वरुडे (ता. शिरूर) येथील रानमाळ वस्ती येथे घराबाहेर झोपलेल्या इसमाचा गळा चिरून खून करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली असून बाळासाहेब बबन तांबे असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे तर याबाबत शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वरुडे (ता. शिरूर) येथील रानमाळ वस्ती येथील बाळासाहेब तांबे व त्यांची आई हौसाबाई तांबे हे घराबाहेर झोपलेले असताना बाळासाहेब कट्ट्यावर तर हौसाबाई ओट्यावर झोपलेल्या असताना बाळासाहेब यांचा भाऊ प्रकाश तांबे हा शेजारील दुसऱ्या खोलीमध्ये झोपलेला होता, सोमवार ८ जून २०२६ रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास अचानक आवाज आल्याने बाहेर



झोपलेल्या हौसाबाई या जाग्या झाल्या असताना तेथून अंधारात एक इसम पळून जाताना त्यांना दिसला तर घराबाहेर झोपलेला बाळासाहेब हा रक्ताच्या थारोळ्यात पाडल्याचे दिसल्याने हौसाबाई आरडाओरडा करू लागल्या, यावेळी आईचा आवाज ऐकल्याने प्रकाश व त्याचे कुटुंबीय दरवाजा उघडू लागले असता दरवाज्याला बाहेरून कडी असल्याचे निदर्शनास आले, त्यानंतर काही वेळाने प्रकाश बाहेर आले असता त्यांना बाळासाहेब याचा गळा चिरल्याचे व तो रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडल्याचे दिसून आले.

# अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत समर्थ पॅनेलचा दणदणीत विजय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीची मतमोजणी पूर्ण झाली असून, या निवडणुकीत मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनेलने एकहाती विजय मिळवत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. पॅनेलमधील सर्व उमेदवार विजयी झाल्याने चित्रपट क्षेत्रातील सदस्यांनी समर्थ पॅनेलच्या नेतृत्वावर आणि कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केल्याचे स्पष्ट झाले आहे.

महामंडळाच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. त्यापैकी ३ जागा बिनविरोध निवडून आल्याने उर्वरित १४ जागांसाठी मतदान घेण्यात आले. या १४ जागांवर समर्थ पॅनेलने सर्व जागा जिंकत दणदणीत विजयाची नोंद केली.

मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविणाऱ्या समर्थ पॅनेलमध्ये सुनील महाजन, दीपक कदम, अजित शिरोळे, राज काझी, सुशांत शेलार, धनाजी यमकर, सुभाष नकाशे, शरद चव्हाण, प्रवीण पाटील, चैत्राली डोंगरे, रवींद्र गावडे, गणेश गारगोटे, विकास तोरणे या सर्व उमेदवारांचा समावेश होता. या सर्व उमेदवारांनी विजय मिळवत समर्थ पॅनेलचा संपूर्ण पॅनेल निवडून आणला. या निकालामुळे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळात पुढील पाच वर्षांसाठी समर्थ पॅनेलच्या नेतृत्वाखालील कार्यकारिणीकडे सूत्रे जाणार असून, महामंडळाच्या विकासासाठी आणि चित्रपट क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी नव्या जोमाने काम करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

विजयानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना मेघराज राजेभोसले म्हणाले, निवडणुकीच्या काळात विरोधी पॅनेलकडून आमच्यावर अनेक बेछूट आरोप करण्यात आले. मात्र आजच्या निकालातून महामंडळाच्या सभासदांनी ते सर्व आरोप स्पष्टपणे नाकारले असून, गेल्या दहा वर्षांत आम्ही केलेल्या कामावर विश्वास व्यक्त केला आहे. हा विजय आमच्या कार्याची पावती आहे. सभासदांनी दाखविलेल्या या विश्वासामुळे त्यांच्यासाठी अधिक समर्पितपणे आणि जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळाली आहे. महामंडळाच्या सर्व सभासदांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. पुढील काळातही सर्व घटकांना सोबत घेऊन महामंडळाच्या विकासासाठी आणि मराठी चित्रपटसृष्टीच्या हितासाठी आम्ही कटिबद्ध राहू.विजयानंतर समर्थ पॅनेलच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करत सदस्यांचे आभार




मानले. महामंडळाच्या सर्व घटकांना सोबत घेऊन पारदर्शक, विकासाभिमुख आणि सर्वसमावेशक कामकाज करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# परीस पब्लिकेशन पुणे यांचा वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी विशेष उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** पुणे येथील परीस पब्लिकेशन यांनी शालेय विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या पुस्तकांची माहिती मिळावी व त्यातुन वाचनसंस्कृती वाढावी या हेतूने आगळ्या वेगळ्या वह्यांची निर्मिती केली आहे. शालेय विद्यार्थी वेगवेगळ्या प्रकारच्या वह्या लिखाणासाठी वापरत असतात. परीस पब्लिकेशन यांनी वहीच्या मलपृष्ठावर वेगवेगळ्या पुस्तकांची मुखपृष्ठ छापली असुन आतील बाजुस त्या पुस्तकांची थोडक्यात माहिती दिली आहे. त्यामुळे त्या पुस्तकात काय आहे याची माहिती शालेय जीवनातच विद्यार्थांना होणार आहे. विद्यार्थ्यांना उपयुक्त असणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या वह्यांची निर्मिती त्यांनी केली आहे.

नुकताच या आगळ्या वेगळ्या वह्यांचे प्रकाशन परीस पब्लिकेशनचे संचालक गिरीश भांडवलकर, साहित्यिक प्रा.कुंडलिक कदम, युवा लेखक शेखर फराटे, युवा कवी आकाश भोरडे, प्रसिद्ध व्यावसायिक रमेश नरके यांच्या हस्ते करण्यात आले.

तळेगाव ढमढेरे येथील प्रसिद्ध स्टेशनरी व्यावसायिक रमेश नरके यांनी परीस पब्लिकेशन यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थी या वह्यांचे नक्कीच स्वागत करतील असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.

वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी परीस पब्लिकेशन यांनी केलेल्या उपक्रमामुळे वेगवेगळ्या लेखकांच्या पुस्तकांची माहिती मुलांना होणार आहे, त्यामुळे पुस्तक मुलांपर्यंत पोहचणार असुन वाचन संस्कृती वाढण्यास मदत होईल असे मत साहित्यिक प्रा.कुंडलिक कदम यांनी व्यक्त केले. लेखकांची पुस्तके या माध्यमातून मुलांपर्यंत पोचण्यास या उपक्रमामुळे हातभार लागणार आहे, असे मत युवा कवी आकाश भोरडे यांनी व्यक्त केले तर युवा लेखक शेखर फराटे यांनी मुलांना योग्य वेळी जर पुस्तकांची माहिती मिळाली तर नक्कीच त्यांच्यात



वाचनाची आवड निर्माण होईल असा आशावाद व्यक्त केला.

# पर्यावरण दिनानिमित्त खळद येथे ग्रामगौरव प्रतिष्ठानने आयोजित केला बीज महोत्सव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** देशी बियाणांचे जतन व संवसर्धन, जैव विविधता संरक्षण व पर्यावरण रक्षण याबाबत जनजागृती करण्याच्या दृष्टीने पुरंदर तालुक्यातील खळदच्या गोटी माळ येथे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून बीज महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. येथील ग्रामगौरव प्रतिष्ठान संचलित इंद्रनील पुरंदर जैव विविधता केंद्राच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास शेतकरी तसेच अनेक पर्यावरण प्रेमींनी हजेरी लावली. पर्यावरणावर काम करणाऱ्या संस्था, शेतकरी यांचा गौरव, मौलिक व्याख्यान देशी बियाणे, जैव विविधता, पर्यावरण पूरक उपक्रम तसेच स्थानिक जैवसंपदेची माहिती देणाऱ्या स्टॉलचीं उभारणी या द्वारे हा कार्यक्रम करण्यात आला. कार्यक्रमात ग्राम गौरव प्रतिष्ठानच्या कल्पना साळुंखे यांनी पर्यावरण संरक्षण काळाची गरज असून प्रत्येकाने वृक्षारोपण व जलसंवर्धन या कामी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. पक्षी मित्र अमित पावसे यांनी जैव विविधता संरसक्षण साठी छाया चित्रणातील बारकावे व नोंदी यावर माहिती दिली. संजय पाटील व मारुती जाधव यांनी या प्रसंगी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. शिवशक्ती सामाजिक सेवा ट्रस्ट, आम्ही झाडंकरी फाउंडेशन, अमोल दुर्गाडे, सुरज गदादे, पिंगोरी व सुकलवाडी ग्रामपंचायत आदींचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. सागर भोंडे यांनी सूत्रसंचालन तर योगेश मगर यांनी प्रास्तविक केले. डॉ सोनाली शिंदे, प्रशांत बोरवके, राजकुमार पवार या मंडळींनी कार्यक्रमाचे सुंदर आयोजन केले.



ग्रामगौरव प्रतिष्ठानच्या वतीने संस्था व व्यक्ती यांचा सन्मान करण्यात आला


## जाहीर नोटीस

**एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील विनियम क्र.११.२ नुसार हस्तांतरणीय विकसन हक्क दाखला (टीडीआर) बाबत**

सर्व संबंधिताना या नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, बारामती नगरपरिषद हद्दीतील मौजे रुई येथील गट नं. ८८ मधील क्षेत्र ५ हे. ३३ आर. ही मिळकत श्रायबर डायनामिक्स डेअरीज प्रा लि यांचे मालकीची असून सदर मिळकतपैकी बारामती नगरपरिषदेच्या हद्दीच्या मंजूर विकास योजनेनुसार २२४९ चौ.मी. क्षेत्र बाधित होत आहे. सदर क्षेत्र उपअधिक्षक भूमि अभिलेख बारामती यांचेकडील मोजणी नकाशा अ.अ.तातडी पो.हि. मो.र.नं. ०२७११३/२०२५ दिनांक १३/०६/२०२५ वर दर्शविण्यात आलेले आहे.

सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांनी उपरोक्त रस्ता आरक्षणाने बाधित क्षेत्र २२४९ चौ.मी. जागेच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकास हक्क दाखल (टी.डी. आर.) मिळणेकामी दिनांक ०३/०२/२०२६ रोजी बारामती नगरपरिषदेकडे प्रस्ताव दाखल केला आहे.

मिळकतीचे वर्णन – बारामती नगरपरिषद वाढीव हद्दीतील मौजे रुई येथील गट नं. ८८ मधील बाधित २२४९ चौ.मी. क्षेत्र श्रायबर डायनामिक्स डेअरीज प्रा लि यांचे मालकीचे असून मंजूर विकास योजनेनुसार ५० मीटर रुंद विकास योजना रस्ता ने बाधीत होत आहे.

त्याची चतुःसीमा खालीलप्रमाणे –
पूर्वेस : नाला
दक्षिणेस : गट नंबर ८१ आणि ८२
पश्चिमेस : बारामती भिगवण रस्ता
उत्तरेस : गट नंबर ८९

उपरोक्त उल्लेख केलेल्या विद्यमान मालक यांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची तसेच त्यांना हस्तांतरणीय विकसन हक्क (टीडीआरसी) प्राप्त करुन घेण्याचे हक्क व अधिकार असल्याबाबत, सदर मिळकत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नाही तसेच त्यावर जप्ती अगर मनाईचा हुकूम नसल्याबाबत खात्री व भरंवसा आम्हास दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीन, लीज, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, अपिल, कूळ, खंड, साठेखत, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद, बारामती यांचेकडे समक्ष येऊन मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी. येणेप्रमाणे मुदतीत आक्षेप न आल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला असल्याचे समजण्यात येऊन बारामती नगरपरिषदे तर्फे सदर मिळकतीच्या मोबदल्यात हस्तांतरणीय विकसन हक्क दाखला (टीडीआरसी) प्रस्तावधारक श्रायबर डायनामिक्स डेअरीज प्रा लि यांचे नावे देण्यात येईल व सदरची जमीन नगरपरिषद ताब्यात घेईल. मुदतीनंतर येणा-या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.


# नगरसेवक किशोर मासाळ यांच्या वक्तव्याविरोधात राजीनाम्याची मागणी

## नगरसेवकांचे सह्याचे निवेदन सादर..!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती नगर परिषदेचे नगरसेवक किशोर मासाळ यांनी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते अजितदादा पवार यांच्याविषयी केलेल्या बेताल आणि आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व सयोगी पक्षाच्या नगरसेवक-नगरसेविकांनी त्यांच्या नगरसेवक पदाच्या राजीनाम्याची मागणी करणारे सह्यांचे निवेदन (दि:८) रोजी सादर केले. यावेळी सर्व नगरसेवकांनी सहयोग या निवासस्थानी जाऊन अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर आदरणीय सुनेत्रा पवार यांचे ओएसडी सचिन यादव यांच्याकडे निवेदन सुपूर्द करण्यात आले.



या प्रसंगी नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, गटनेते संजय संघवी, उपगटनेते संपदा चौधर, प्रतोद विशाल हिंगणे, सभापती अमर धुमाळ, नवनाथ बल्लाळ, जयसिंग देशमुख, सविता जाधव, मनीषा चव्हाण तसेच नगरसेवक जय पाटील, विष्णुपंत चौधर, बिरजू मांढरे, अभिजीत चव्हाण, अभिजीत जाधव, अविनाश निकाळजे, अनुप्रिता डांगे-तांबे, रुपाली मलगुंडे, प्रवीण माने, धनश्री बांदल, भारती शेळके, प्रसाद खारतोडे, पूनम चव्हाण, मनिषा बनकर, सारिका वाघमारे, मंगल किर्वे, मंगल जगताप, गोरख पारसे, शर्मिला ढवाण, अल्ताफ सय्यद, अश्विनी सातव, राजेंद्र सोनवणे, प्रतिभा खरात, अग्निन बागवान, दर्शना तांबे, निलेश इंगुले, सोमनाथ गजाकस, अमोल कावळे, गणेश जोजारे आणि राहुल वाघोलीकर यांच्या सह्याचे निवेदन देण्यात आले.

अजित पवार यांच्याविषयी करण्यात आलेले वक्तव्य बारामतीकरांच्या भावना दुखावणारे असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त करत निषेध केला. अशा प्रकारच्या अपमानास्पद वक्तव्यांना जनतेकडून कधीही समर्थन मिळणार नाही, तसेच संबंधित नगरसेवकाविरोधात कठोर कारवाई करून त्यांनी राजीनामा द्यावा व तो स्वीकारण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी सर्व उपस्थितांनी एकमुखाने निषेध व्यक्त करत अजितदादांविषयी आदर व निष्ठा कायम असल्याची भावना व्यक्त केली.

''बारामतीकरांच्या भावना दुखावल्या'' अजित पवार यांच्याविषयी करण्यात आलेले वक्तव्य हे बारामतीकरांच्या भावना दुखावणारे असून अशा प्रकारच्या वक्तव्यांना जनतेकडून कधीही समर्थन मिळणार नाही, असे मत निवेदन देणाऱ्या नगरसेवकांनी व्यक्त केले. संबंधित नगरसेवकाने तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा व त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी उपस्थित नगरसेवकांनी अजित पवार यांच्याविषयी आदर व निष्ठा व्यक्त करत एकमुखाने निषेध नोंदविला.

द • ख • ल

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चापडगाव विद्यालयात वटवृक्ष लागवड



**एरंडगाव :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शेवगाव तालुक्यातील चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे वृक्षसंवर्धनाचा संदेश देत पाच वटवृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पालक नानासाहेब अशोक थोटे, गणेश नामदेव तेलोरे, विठ्ठल अंबादास भिसे तसेच महिला पालक मीना बाळू बटुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयाचे प्राचार्य संपतराव दसपुते, उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनाची काळाची गरज अधोरेखित करत प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प व्यक्त केला. वृक्ष हे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास, प्रदूषण कमी करण्यास तसेच भावी पिढ्यांना शुद्ध हवा व निरोगी जीवन देण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.

## स्पर्धेच्या युगात लढणाराच टिकतो, जिंकतो : डॉ. पुरुषोत्तम भापकर



**शेवगाव :** स्पर्धेच्या युगात प्रत्येक क्षेत्रात आव्हाने आहेत. या आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाणारा विद्यार्थीच यशाचा मानकरी ठरतो, असे प्रतिपादन माजी आयएएस अधिकारी, प्रसिद्ध लेखक व कवी डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी केले. अमरावती येथे आयोजित चौथ्या स्पर्धा परीक्षा व विद्यार्थी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. विशेष म्हणजे शेवगाव तालुक्यातील सालवडगावचे भूमिपुत्र असलेल्या डॉ. पुरुषोत्तम भापकर यांना या राज्यस्तरीय संमेलनाचे अध्यक्षपद मिळणे ही संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी गावाचे नाव राज्यभर उंचावले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी अमरावती, प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट वलगाव आणि त्रिवेणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक दिन तसेच स्व. सुखदेवराव बोंडे व स्व. त्रिवेणीताई बोंडे स्मृतिप्रीत्यर्थ या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य निवडणूक अधिकारी तथा आयएएस अधिकारी श्रीमती भाग्यश्री बानायत यांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, स्वागताध्यक्ष डॉ. पंजाबराव कथे, प्राचार्य डॉ. रामदास चवरे, मिशन आयएएसचे संचालक डॉ. नरेशचंद्र काठोळे, डॉ. चेतन शेलोटकर, देवेंद्र खडसे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी यूपीएससी परीक्षेत यश संपादन करणाऱ्या हेमकृष्ण प्रेमलाल पिसदे, प्रज्वल धनराज नासरे आणि रेणुका दिनेशराव केकन यांचा सत्कार करण्यात आला.

## वृक्षारोपण ही काळाची गरज : बऱ्हाटे



**टाकळी ढोकेश्वर :** वृक्षारोपण ही काळाची गरज असून वृक्षारोपण करण्याबरोबर वृक्ष संगोपन व वृक्ष संवर्धन करणे तितकेच आवश्यक असल्याचे प्रतिपादन मा.जिल्हा कृषी अधीक्षक भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले. यावेळी रावसाहेब रोहोकले, बाळासाहेब खराबी, भिमाजी लोंढे,किसन पायमोडे, कोमल तांबे यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली.यावेळी संकल्पसिद्धी गार्डनमध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी नारायण खिलारी, चंद्रकांत खिलारी, ठकाजी दूस,सिताराम दूस, प्रा. बबनराव झावरे, बबनराव खामकर, पोपट गोरडे,सुखदेव भोर, पोपट बोरुडे, प्रकाश गोरडे, शिवाजी खामकर, शिवाजी वाळुंज, अरुण भांड,संजय कुसकर,बाळासाहेब भांबरे, बाबुराव नाईकवाडी, काशिनाथ पायमोडे, विश्वनाथ गोरडे, रमेश झावरे, ओंकारेश्वर झावरे, अशोक वाळुंज, बबन कोकाटे, सूर्यभान भालेकर, राजाराम उंडे, रघुनाथ झावरे, भानुदास खिलारी, नानासाहेब झावरे, एकनाथ बांडे, शेटीबा शिंदे, चांद शेख, संतोष सोनावळे, प्रताप खिलारी, आदिनाथ पायमोडे उपस्थित होते. प्रास्ताविक गीताई प्रतिष्ठानचे अध्यक्ष तुकाराम झावरे यांनी व स्वागत प्रा.किसनराव पायमोडे यांनी केले. शिवाजी वाळुंज यांनी सूत्रसंचालन तर बबनराव गायके यांनी आभार मानले.

## श्रीराम विद्यालयाचे चार विद्यार्थी इस्त्रो सहलीसाठी पात्र



**ढोरजळगाव :** रेसिडेंशिअल हायस्कूल शेवगाव येथे नुकतीच आयोजित करण्यात आलेल्या डॉ. सी. व्ही. रमन बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत विद्यालयातील २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे चार विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत इस्त्रो सहलीसाठी पात्रता मिळवली आहे. इस्त्रो सहलीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता ५ वीची कु. स्वानंदी सोपान सासवडे, इयत्ता ७ वीची आकांक्षा गणेश कोल्हे, इयत्ता ८ वीची गिरीजा देविदास देशमुख आणि इयत्ता ९ वीचा चि. प्रबोध रामकृष्ण पाटेकर यांचा समावेश आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाच्या शिक्षिका वैशाली धोंडे तसेच राहुल दहातोंडे, सचिन कुलकर्णी, सुदाम काळे व स्वाती गरड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या गुणवंत विद्यार्थ्यांचे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. डॉ. विद्याधर काकडे , मा. जि.प. सदस्या हर्षदा काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, शिक्षण विभाग सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य संजय चेमटे, पर्यवेक्षिका सुरेखा शेलार, विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच परिसरातील पालकांनी अभिनंदन केले आहे.

# कांद्याला हमीभाव द्या; काँग्रेसचे तहसील कार्यालयावर आंदोलन

## शेतकरी विरोधी शासन निर्णयाची होळी; ट्रॅक्टर रॅलीने श्रीगोंदा दणाणले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति किलो किमान २५ रुपये हमीभाव तात्काळ जाहीर करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच महाराष्ट्र शासनाने २ जून २०२६ रोजी जाहीर केलेला शेतकरीविरोधी व फसवा शासन निर्णय तात्काळ रद्द करावा, या प्रमुख मागण्यांसाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज श्रीगोंदा तहसील कार्यालयावर तीव्र आंदोलन करण्यात आले.

प्रदेश उपाध्यक्ष युवक काँग्रेस प्रशांत ओगले आणि जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी अहिल्यानगर किरण पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व काँग्रेस कार्यकर्त्यांनी ट्रॅक्टर रॅली काढून शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलकांनी २ जून २०२६ च्या शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करून निषेध नोंदविला.

कांद्याला उत्पादन खर्चापेक्षाही कमी दर मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रति किलो किमान २५ रुपये हमीभाव देणे अत्यावश्यक असल्याचे आंदोलकांनी सांगितले. शासनाचा २ जून २०२६ चा निर्णय हा शेतकऱ्यांची दिशाभूल करणारा असून त्यामध्ये तातडीने सुधारणा करून शेतकरी हिताचे निर्णय घ्यावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास पुढील आठ दिवसांत विविध मार्गांनी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत ओगले यांनी दिला. यावेळी जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी किरण पाटील, तालुकाध्यक्ष संतोष भोईटे, शहराध्यक्ष ॲड. सुमित बोरुडे, महिला काँग्रेस अध्यक्षा सुनीता दराडे, युवक अध्यक्ष विकास काळे, सरपंच भगवान कणसे, महेश दरेकर, डॉ. बायकर, चेअरमन शहाजी खेडकर पाटील, शंकर कोठारी, संदीप दहतोंडे, जितू पाटोळे, निलेश उबाळे, विजय बारगुजे, उपसरपंच राम घोडके, संतोष सोनवणे, संदीप वागस्कर, सोहेल शेख यांच्यासह अनेक शेतकरी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलकांच्या वतीने तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

# मढेवडगावच्या शेतकऱ्यांचा फसव्या कर्जमाफी विरोधात आक्रोश

## जाचक अटींच्या जीआरची प्रतीकात्मक होळी; शेतकऱ्यांचा संताप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



मुख्यमंत्री साहेब शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे तो काही तुमच्या दारात कर्जमाफी मागण्यासाठी आला नव्हता परंतु तुम्हाला निवडणुका जिंकायच्या होत्या म्हणून तुम्हीच खोटी आश्वासने दिली. आज शेती उपयोगी साहित्यांचे खतांचे बी- बियाण्याचे भाव गगनाला भिडलेले आहेत आणि शेतकऱ्यांनी पिकवलेला माल बाजारामध्ये कवडी मोलाच्या भावामध्ये विकावा लागत आहे.

**बापूसाहेब वाबळे**
**अध्यक्ष मढेवडगाव सोसायटी**

आमच्या घामाचा, आमच्या कष्टाचा आणि आमच्या आशांचा, आमच्या मुलाबाळांच्या भावनेचा सन्मान करा, शेतकरी टिकला तरच देश व तुमचे राज्य चालेल तुम्ही शेतकऱ्यांनाच मातीत घालायला निघाला असताल तर हा शेतकरी निश्चित तुमच्या या सरकारला मातीत घालेल.

**जनसेवक: स्मितल वाबळे**

**लिंपणगाव :** मढेवडगाव (ता. श्रीगोंदा) येथे आज शेतकऱ्यांच्या मनात साचलेला वेदना, आक्रोश आणि संताप अक्षरशः उफाळून बाहेर आला. कर्जमाफीच्या नावाखाली जाहीर करण्यात आलेल्या जाचक अटींमुळे शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांचा चुराडा झाल्याची भावना व्यक्त करत शेतकऱ्यांनी जनसेवक स्मितल वाबळे, सरपंच प्रमोद शिंदे, बापूसाहेब वाबळे, यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडले.

निवडणुकीच्या काळात सातबारा कोरा करू अशी दिलेली आश्वासने शेतकऱ्यांच्या मनात मोठी आशा निर्माण करून गेली होती. मात्र प्रत्यक्षात गेल्या दोन वर्षांपासून केवळ घोषणांचा खेळ सुरू राहिल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी आपला संताप व्यक्त केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने जाहीर झालेल्या या कर्जमाफी योजनेत अनेक कठोर आणि जाचक अटी टाकून, खऱ्या गरजू शेतकऱ्यांनाच या योजनेपासून दूर ठेवण्याचा प्रकार घडत असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. यावेळी सरपंच प्रमोद शिंदे, बापूसाहेब वाबळे, राहुल साळवे, जयसिंग मांडे, झुंजरुक, दत्तात्रय उंडे, मानसिंगराव मांडे, भीमराव फरकांडे, विठ्ठलराव वाबळे, शरद शिंदे व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# ११ जूनला राज्य शिक्षक संघाची सभा शिक्षण हक्क परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य माणसाच्या हक्कांसाठी याच ऐतिहासिक राळेगणसिद्धी भूमीतून समाजसेवक अण्णा हजारे यांनी अनेक जनआंदोलने यशस्वी केली आहेत. त्यामुळे या महामंडळ सभेकडे राज्यभरातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

**शरद कोतकर**
**युवा शिक्षक संघ**

**पारनेर :** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची महामंडळ सभा आणि शिक्षण हक्क परिषद स्वर्ग लॉन्स राळेगणसिद्धी ता. पारनेर जि. अहिल्यानगर येथे दि.११ जुन २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित केली असल्याची माहिती अहिल्यानगर जिल्हा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रविण ठुबे यांनी दिली आहे..

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे नेते संभाजीराव थोरात व राज्य संघाचे अध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या नेतृत्वाखाली या ऐतिहासिक महामंडळ सभेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य संघाचे उपनेते रावसाहेब रोहोकले गुरुजी, राष्ट्रीय शिक्षक महासंघाचे नेते बाळासाहेब झावरे, राष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष आबासाहेब जगताप, बाळकृष्ण तांबारे, मच्छिंद्रनाथ मोरे, किशन इदगे, सचिन डिंबळे, स्वाती शिंदे, शिक्षक नेते डॉ. संजय कळमकर, संजय शेळके, रामराव निकम, रावसाहेब सुंबे, राजकुमार साळवे आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत. या महामंडळ सभेसाठी पद्मभूषण, थोर समाजसेवक अण्णा हजारे व आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.टीईटी, संचमान्यता, पदोन्नती, बीएलओ कामे, पदोन्नती, ऑनलाइन कामे यासारख्या अनेक समस्यांनी शिक्षक वर्गात प्रचंड अस्वस्थता आहे. सरकारी शाळा टिकवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. सरकारी शाळांचा आवाज बनण्याची विनंती आण्णासाहेब हजारे यांनी मान्य केल्याने शिक्षक चळवळीला एक नवा आशावाद निर्माण झाला आहे. समाजसेवक आण्णा हजारे व पोपटराव पवार यांच्या माध्यमातून सरकारमध्ये जागृती करण्यासाठी व शिक्षक आंदोलनाची नवी दिशा ठरविण्यासाठी तसेच कायदेशीर लढाई लढण्यासाठी या महामंडळ सभेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शिक्षक संघाचे अकोले तालुकाध्यक्ष मच्छिंद्र सुकटे, संगमनेर तालुकाध्यक्ष सोमनाथ घुले, कोपरगाव तालुकाध्यक्ष वाल्मिक खंडीझोड, राहाता तालुकाध्यक्ष सुधाकर अंत्रे, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष गणेश पिंगळे, राहुरी तालुकाध्यक्ष विठ्ठल वराळे, पारनेर तालुका अध्यक्ष युवराज हिलाळ, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष संदीप ढगे नेवासा तालुका अध्यक्ष विठ्ठल कांगुणे, पाथर्डी तालुकाध्यक्ष भालचंद्र गर्जे, कर्जत तालुकाध्यक्ष विनोद देशमुख, जामखेड तालुकाध्यक्ष नवनाथ बहिर यांनी दिली आहे.

# शेवगावच्या २४ ग्रा प.च्या प्रभागाचे आरक्षण उद्या निश्चित?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** डिसेंबर २५ पर्यंत मुदत संपलेल्या शेवगाव तालुक्यातील ५४ ग्रामपंचायतीच्या नव्याने निवडणुका घेण्यासाठी प्रशासनाने जोमाने तयारी सुरू केली असून या सर्व ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचना व जनतेतून निवडून जाणाऱ्या सरपंच पदाचे आरक्षण या पूर्वीच निश्चित करण्यात आल्या असून आता निश्चित करण्यात आलेल्या या प्रभागातून निवडून जाणारे जे आरक्षण आहे. ते मात्र ग्रामसभेतून निश्चित करण्यात येणार असल्याने २४ ग्रामपंचायतीचे आरक्षण आज २४ चे उद्या व ६ चे परवा ग्रामसभा घेऊनच निश्चित करण्यात येणार असल्याबाबतची माहिती तहसीलदार आकाश दहाडदे व निवडणूक शाखेचे अव्वल कारकून सुरेश बर्डे यांनी दिली आहे. त्यामध्ये आज मंगळवार ठाकूर निमगाव, सालवडगांव, खामपिंपरी जुनी व नवीन, अंतरवली खुर्द व बुद्रुक, वरखेड, राक्षी, मंगरूळ बुद्रुक व खुर्द, हसनापूर, कोळगाव, ढोरजळगाव बुद्रुक व खुर्द, घोटण, तळणी, कोनोशी, नागलवाडी, गायकवाड जळगाव, सोनविहिर, दादेगाव, ताजनपूर,भविनीगाव व सुलतानपूर बुद्रुक या २४ गावांचे आज तर उद्या बुधवार वाडगाव, माळेगांव ने, पिंगेवाडी, गदेवाडी, चापडगाव, ठाकूर पिंपळगाव, चेडेचादगाव, सोनेसांगवी, खुंटेफळ, बोडखे, हातगाव, लखमापूरी, निंबेनादूर, आखातवाडे, राणेगाव, दहिफळ जुने व नवीन,शिंगोरी, कांबी, दहीगांव -शे, मळेगांव - शे, आव्हाने खुर्द,मजलेशहर व बक्तरपुर या २४ गावाचे तर परवा गुरुवार नजीक बाभुळगाव, भातकुडगाव, सुकळी, अधोडी व शेकटे बुद्रुक या ६ गावांचे आरक्षण निश्चित करण्यात येत असून या सर्व ५४ ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेसाठी तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या असल्याचेही शेवटी दहाडडे व बर्डे यांनी सांगितले आहे.

# बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी आ. दातेंचा पुढाकार

## १८६ कामगारांना सुरक्षा साहित्य किटचे वाटप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



बांधकाम कामगार हे विकासाच्या प्रत्येक कामाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, कोणताही पात्र कामगार योजनांपासून वंचित राहू नये यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा. बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा माझा मानस आहे, योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असलेल्या स्वयंसहाय्यता गट, अधिकारी व कर्मचाऱ्यांचेही विशेष अभिनंदन केले.

**आ. काशिनाथ दाते**

**पारनेर :** बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शासन राबवत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांनी केले. टाकळी ढोकेश्वर येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने तालुक्यातील १८६ बांधकाम कामगारांना सुरक्षा साहित्य किटचे वाटप करण्यात आले. यावेळी आ. दाते यांनी उपस्थित बांधकाम कामगारांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. मतदारसंघातील बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करणारे जिल्ह्याचे पालकमंत्री विखे पा., कामगार मंत्री आकाश फुंडकर, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार.

# अवकाळी पावसाने श्रीगोंदा तालुका झोडपला

## डाळिंब, कांदा, सोलर व घरांचे मोठे नुकसान; पंचनामे सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात काल सायंकाळी झालेल्या अचानक वादळी पावसाने शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून शेती, फळबागा, सोलर यंत्रणा आणि घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक गावांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले.

अनेक ठिकाणी शेकऱ्याने बाजार वाढेल या आशेने वखारीत साठवून ठेवलेला कांदा वखारींमध्ये पाणी शिरल्याने कांदा भिजून सडला असल्याने शेतकऱ्यांच्या स्वप्नाचे पाणी झाले असून डाळिंब बागांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी संरक्षण नेट फाटून उध्वस्त झाले तर लिंबू व आंब्याची झाडेही कोसळली. शेतातील सोलर यंत्रणा उखडून पडल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. काही घरांची पत्रे उडाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. प्राथमिक माहितीनुसार तालुक्यातील बेलवंडी कोठार परिसरातील आशा दत्तात्रय कोठारे, स्वप्निल दत्तात्रय कोठारे, उदयन शिवाजी कोठारे, रामदास पंडित कोठारे, मनीषा रामदास कोठारे यांच्या डाळिंब बागांचे नुकसान झाले आहे. पार्वती नानासाहेब कोठारे, आनंदराव भाऊराव कोठारे आणि अक्षय रामदास कोठारे यांच्या शेतातील सोलर यंत्रणेचे नुकसान झाले. पांडुरंग श्रीरंग कोठारे यांच्या लिंबू बागेचे तर विलास विठ्ठल पोटे, नितीन छबुलाल चव्हाण, शंकर शिवाजी झराड, नाना बापू बाबर, मंजुषा लक्ष्मण हराळ, भरत बलभीम जराड आणि सुभाष पतिंग झराड यांच्या शेतीचे नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली आहे. दत्तू तुकाराम झराड यांच्या घरावरील पत्रे उडून आंब्याचे झाड पडल्याची माहिती समोर आली आहे.असे जवळपास सर्वच गावात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# लिंपणगावच्या दलित वस्तीत दहा वर्षापासून वॉटर फिल्टर बंद

## ग्रामपंचायतीकडून मात्र दुर्लक्ष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

या प्रश्नासंदर्भात ग्राम विकास अधिकारी श्री धायगुडे यांच्याशी संपर्क साधला असता सदर वॉटर फिल्टरचा विद्युत पुरवठा बंद आहे तो तात्काळ चालू करून दलित वस्तीत लवकरच शुद्ध पाणी उपलब्ध करून देऊ असे श्री धायगुडे यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील मोठ्या लोकसंख्येचे गाव समजल्या जाणाऱ्या दलित वस्तीत गेल्या दहा वर्षांपूर्वी ग्रामपंचायत अंतर्गत बसवण्यात आलेला वॉटर फिल्टर केवळ विद्युत पुरवठा बंद असल्यामुळे केवळ विद्युत पुरवठा अभावी बंद आहे तो चालू होऊ शकला नाही, असा आरोप विजय ओहोळ यांनी केला आहे. त्यामुळे दलित वस्तीत स्मार्ट कार्ड योजनेअंतर्गत शुद्ध पिण्याचे पाणी मिळू शकत नाही केवळ ग्रामपंचायत प्रशासन या प्रश्न कारणीभूत असल्याचा आरोप युवक नेते विजय ओहोळ यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

याबाबत पत्रकारांना अधिक माहिती देताना ओहोळ पुढे म्हणाले की, ग्रामपंचायत प्रशासनाने गेल्या दहा वर्षांपूर्वी दलित वस्तीत लाखो रुपये खर्च करून दलित वस्तीतील गोरगरीब जनतेला शुद्ध पिण्याचे पाणी अल्प दरात उपलब्ध होण्यासाठी वॉटर फिल्टर बसवले. परंतु हे वॉटर फिल्टर फक्त नावालाच असून, त्याचा देखावा दिसून येत आहे. असे सांगून ओहोळ व माजी सरपंच अरविंद कुरुमकर यांनी म्हटले आहे की, ग्रामपंचायत प्रशासनाला अनेक वेळा निवेदने दिली. चर्चा केली. परंतु फक्त आश्वासन देऊन आमची बोळवण केली जाते. सद्यस्थितीला उन्हाची तीव्रता अत्यंत भीषण आहे. पाण्याचा प्रश्न तितकाच तीव्र बनत चालला आहे. अशा परिस्थितीत दलित वस्ती नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने खर्च करून वॉटर फिल्टर बसवले. परंतु अद्याप पर्यंत केवळ विद्युत पुरवठा बंद असल्यामुळे वॉटर फिल्टर चालू होऊ शकले नाही. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने लाखो रुपये खर्च करून वाटर फिल्टर बसवला परंतु नागरिकांना नादुरुस्त असल्यामुळे दलित वस्तीत पिण्याच्या पाण्यासाठी पैसे देऊन बाहेरून पिण्यासाठी पाणी आणावी लागते. एकीकडे हाताला काम नाही, शेतीला पाणी नाही, कुटुंबाचे उदारनिर्वाह कसे करावे, असा प्रश्न देखील या दलित वस्तीतील नागरिकांसमोर असताना जीवन जगणे प्रत्येकालाच आता मुश्किल बनले आहे.

# तीन महिन्यानंतरही अज्ञात व्यक्तीच्या मृतदेहाची ओळख पटेना

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील आव्हाडवाडी शिवारात २८ फेब्रुवारीला अज्ञात व्यक्ती आजारी अवस्थेत आढळून आला होता. जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना ३ मार्च रोजी त्याचा मृत्यू झाला होता. सदर मृतदेहाची तीन महिने उलटून देखील अद्याप ओळख पटलेली नाही.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, २८ फेब्रुवारी रोजी आव्हाडवाडी शिवारातील महादेव बाजीराव आव्हाड यांच्या शेतातील चिंचेच्या झाडाखाली अज्ञात व्यक्ती आजारी अवस्थेत आढळून आली होती. स्थानिकांनी १०८ रुग्णवाहिकेला कॉल करून त्यास जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान तीन मार्चला सदर व्यक्तीचा मृत्यू झाला. सदर घटनेबाबत सुरुवातीला सोनई पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. परंतु घटना एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने नोंद वर्ग करण्यात आली. मृत व्यक्ती अंदाजे ३५ वर्षे वयाची पुरुष जातीचे आहे. सड पातळ, दाढी, मिशा व डोक्याचे केस वाढलेले, रंगाने सावळा व अंगात निळसर रंगाची पॅन्ट परिधान केलेली आहे. एमआयडीसी पोलिसांकडून सदर मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. परंतु घटनेला तीन महिने उलटून देखील अद्याप ओळख पटलेली नाही. सदर मयत व्यक्ति बद्दल अथवा नातेवाईकांबद्दल काही माहिती असल्यास एमआयडीसी पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

मंगळवार दि.९ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## चास पिंपळदरी येथे उत्पादन शुल्क विभागाची कारवाई | पाच आरोपींना अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अकोले :** कोतूळ परिसरातील चास पिंपळदरी येथे जिल्हा उत्पादन शुल्क विभागाने ताडी, गावठी दारू अड्डे उद्ध्वस्त केले.या कारवाईत पाच आरोपींना अटक करुन ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. कोतूळ परिसरातील चास पिंपळदरी येथील गावठी दारू तयार करणारा ज्ञानदेव कुंडलिक बर्डे (पिंळदरी), नवनाथ सुरेश देशमुख (केळंगण), चंद्रकांत पाबळकर (राजूर), सुनीता गुत्तेदार, लक्ष्मी गुत्तेदार (घारगाव) यांच्या अवैध दारू विक्री ठिकाणी कारवाई केली. यात ९९.३६ लिटर देशी दारू, १५० लिटर ताडी, ११० लिटर रसायन असा ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पाचही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. उत्पादन जिल्हा अधीक्षक प्रमोदकुमार सोनवणे, ऋषिकेश इंगळे, प्रमोदकुमार तेली यांच्या आदेशाने निरीक्षक योगेश सावखेडकर, गोकूळ नायकोडी, विपुल कर्पे, वसंत पालवे, दत्ता खाडे, सरस्वती वराट, स्वाती घोडेकर, विमल घोलप यांनी कारवाई केली. कोणत्याही ठिकाणी ताडी, गावठी किंवा अवैध विक्री किंवा निर्मिती होत असेल तर उत्पादन शुल्क विभागाला फोन किंवा पत्राद्वारे कळवावे. कारवाई होईल.नाव गोपनीय ठेवण्यात येईल.गुन्हेगारांच्या संपत्तीवर किंवा जामिनदाराच्या संपत्तीवर बोजा चढविला जाईल असे, असा इशारा सोनवणे यांनी दिला.

# शनिवारी भाजपा प्रवेश रविवारी उमेदवारी अन् गुरुवारी आमदारकी हीच 'विखे फॅक्टर'ची किमया : आ. तनपुरे

राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** प्राजक्त तनपुरे यांची नुकतीच विधान परिषदेच्या आमदारपदी बिनविरोध निवड झाली. त्यानिमित्ताने राहुरी शहरात त्यांचा भव्य असा नागरी सोहळा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राजक्त तनपुरे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना विखे फॅक्टरमुळेच अवघ्या चार दिवसांत मी आमदार झालो, अशी जाहीर कबुली देऊन ना. राधाकृष्ण विखे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार सुजय दादा विखे पाटील यांचे आभार मानले.



ना. विखे यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात आ. तनपुरे यांनी राहुरी नगर पाथर्डी मतदार संघाच्या विकासकामांसाठी मोठ्या मागण्या केल्या आणि ना. विखेंनी त्यांच्या मागण्यांना मान्यता दिली आहे. यावेळी बोलताना तनपुरे यांनी वावरथ-जांभळी परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी बोट सेवा सुरू करण्यास मदत करण्याची मागणी केली. तसेच राहुरी तालुक्यातील बेरोजगार

युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी प्रलंबित एमआयडीसीचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे साकडे घातले. यावेळी डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्यासाठी एनसीडीसीचे कर्ज मंजुरीसाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून तो लवकर मंजूर व्हावा, अशी विनंतीही त्यांनी केली. राहुरी शहरातील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणासाठी ५० ते १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करताना त्यांनी, हा निधी मिळाल्यास राहुरी शहराचा चेहरामोहरा बदलेल.

विकासकामांच्या पुढील नगरपरिषद निवडणूकही विधान परिषद निवडणुकीप्रमाणे बिनविरोध होईल,' असा विश्वास यावेळी आमदार तनपुरे यांनी व्यक्त केला. एमआयडीसी आणि १०० कोटींच्या निधीची मागणी करून आमदार तनपुरे यांनी ना.विखे पाटलांना साकडे घातले आहे. राजकीय भाषणाच्या शेवटी तनपुरे यांनी भावनिक सूर आळवत म्हटले, विखे पाटील यांच्या कार्यपद्धतीबद्दल आम्ही आतापर्यंत दुरून ऐकत होतो. आता ती जवळून पाहण्याची संधी मिळाली आहे. जुन्या पक्षाशी भावनिक नाते असल्याने निर्णय घेताना दुःख झाले, मात्र आता आम्ही तुमच्याशी जोडले गेलो आहोत. भविष्यातही तुमचे प्रेम आणि सहकार्य कायम मिळेल, याची खात्री आहे. आमदार तनपुरे यांच्या या वक्तव्यामुळे राहुरीच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली असून विखे फॅक्टर ची ताकद पुन्हा एकदा अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यात अधोरेखित झाल्याची प्रतिक्रिया राजकीय वर्तुळातून उमटत आहे.

याप्रसंगी ना. विखे म्हणाले, या गोड कार्यक्रमासाठी मी आनंदाने आलो आहे. माझी बऱ्याच दिवसापासून इच्छा होती की प्राजक्त दादांनी भाजपात येऊन पक्ष बल वाढवून सत्तेच्या माध्यमातून विकास कामे करावीत याचा योग आज आला आहे तुमचे आमचे ऋणानुबंध असेच कायम राहतील. व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे, विनायक देशमुख, प्रेरणा उद्योग समूहाचे सुरेश वाबळे, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, युवा नेते हर्ष तनपुरे, मियांसाहेब पतसंस्थेचे चेअरमन शामराव निमसे, तनपुरे कारखान्याचे माजी चेअरमन नामदेव ढोकणे, तान्हाजी धसाळ, नगर परिषदेचे विरोधी पक्ष नेते राजेंद्र उंडे, प्रकाश देठे, डॉ. संजय भळगट, बाबासाहेब भिटे, मच्छिंद्र सोनवणे, नगरसेवक सागर तनपुरे, राहुल शेटे, निखिल वारे, अहिल्यानगर महापालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव, किसन जवरे, विजय डौले, नगरसेवक अविनाश म्हस्के, सोन्याबापू जगधने, व कार्यकर्ते उपस्थित होते या कार्यक्रमाचे आभार रामदास बाचकर यांनी मानले.

## पैशासाठी जावई, पुतण्याकडून लाकडी दांड्याचे मारहाण

### साईनाथ बर्डे मृत्यूप्रकरणी तिघांना अटक!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** चुलत जावई, पुतण्या व त्याचा आणखी एक मित्र अशा तिघां जणांनी पैशाच्या वादाच्या कारणावरुन साईनाथ बर्डे व त्यांचा मुलगा सुनिल बर्डे या दोघांना दगड व लाकडी दांड्याने मारहाण केली. साईनाथ बर्डे यांना जबरदस्त मार लागल्याने उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची घटना दि. ७ जून रोजी राहुरी तालुक्यातील सडे येथे घडली.



राहुरी तालुक्यातील सडे येथील रहिवाशी असलेले साईनाथ भानुदास बर्डे, वय ५१ वर्षे हे दि. ७ जून २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता सडे येथील महोदव मंदिरामध्ये बसले होते. त्यावेळी तेथे मयत साईनाथ यांचा चुलत जावई, पुतण्या व त्यांचा एक मित्र असे तिघेजण पैशाच्या वादाच्या कारणावरुन साईनाथ बर्डे यांना लाकडी दांड्याने बेदम मारहाण करत होते. तेव्हा साईनाथ बर्डे यांचा मुलगा सुनिल बर्डे हा त्यांना सोडवीण्यासाठी गेला. असता आरोपींनी त्याला दगड मारुन जखमी केले. घटनेनंतर जखमी साईनाथ बर्डे याला नातेवाईकांनी वांबोरी येथील ग्रामीण रुग्णालयात नेले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तेथून अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्या ठिकाणी उपचार सुरु असताना रात्री १०.४५ वाजे दरम्यान साईनाथ बर्डे यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विजय देशमुख, पोलिस उप निरीक्षक गणेश वाघमारे, हवालदार अर्जुन दारकुंडे, प्रमोद ढाकणे, भाऊसाहेब शिरसाठ, सतिष कुऱ्हाडे आदि पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती घेऊन रात्रभर आरोपींचा शोध घेतला. आणि आरोपी लक्ष्मण भाऊसाहेब माळी, सुनिल गंगाधर पवार, सागर सुभाष बर्डे या तिघांच्या मुसक्या आवळून जेरबंद केले.

मयत साईनाथ बर्डे यांचा मुलगा सुनिल साईनाथ बर्डे, वय २८ वर्षे, रा. महादेववाडी, सडे, ता. राहुरी, याने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींवर गुन्हा रजि. ६६४/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ११८ (१), १२५ ब, ११५ (२), ३५१ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे विविध कलमांतर्गत खुनाच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली. पुढिल तपास पोलिस उप निरीक्षक गणेश वाघमारे हे करीत आहे.

## उक्कलगावात विद्यूतपंप चोरीचे प्रमाण वाढले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील उक्कलगाव शेती व्यवसायात अग्रेसर असलेल्या गावात चोरीचे सत्र सुरूच आहे.मात्र हे प्रकार अधिक प्रमाणात दिवसेंदिवस वाढत चालले आहेत.याप्रकरणी, शेतकरी बाबासाहेब भिकाजी थोरात (रा.उक्कलगाव ) यांनी श्रीरामपूर शहर पोलिसांना तक्रार दाखल केली.शहर पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की,वाकणवस्ती शिवारात ( गट नं.४६ ) मध्ये शेती आहेत.

रविवारी (दि.७) जून रोजी वाकण वस्ती शिवारात शेतीची पूर्ण दिवस वीजपुरवठा सुरू नव्हता. त्यामुळे काही शेतीत काम नसल्याने शेतीकडे गेलेले नाहीत.मात्र सोमवारी दुसऱ्यादिवशी शेतीची लाईट सकाळी १० वाजता येणार असल्याने शेतीत वीजपंप (मोटार) चालु करण्यासाठी गेले.त्यावेळी तेथे मला विद्युत मोटार ५ एचपी, १२५ फुट केबल,एक ड्रम असा एकूण ४० ते ४५ किंमतीचे शेतीचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे लक्षात आले. असे फिर्यादीत म्हटले आहेत.याप्रकरणी शेतकरी बाबासाहेब भिकाजी थोरात(रा.उक्कलगाव ) यांच्या शहर पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.अधिक तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## दुप्पट नोटांचे आमिषाने फसवणूक

### वाळकीचा राम बोठेला अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** दुप्पट नोटा छापून देण्याचे आमिष दाखवत नागरिकांची फसवणूक करणाऱ्या फरार आरोपी वाळकी येथील प्रशांत उर्फ राम मधुकर बोठे याला शेवगाव पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पाथरवाला बुद्रुक (ता. गेवराई, जि. बीड) येथील रोहीदास बप्पासाहेब पारे (वय २७) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान आरोपी प्रशांत उर्फ राम मधुकर बोठे (रा. वाळकी, ता. नगर, जि. अहिल्यानगर) याने नागरिकांकडून मोठी रक्कम घेऊन त्याबदल्यात दुप्पट नोटा छापून देण्याचे आमिष दाखवत फसवणूक केल्याचे समोर आले. पिडीत व्यक्तींकडून रक्कम घेतल्यानंतर नोटा छापण्याच्या प्रक्रियेदरम्यान गोंधळ निर्माण करून त्यांची रक्कम घेऊन तो फरार होत असल्याची माहिती तपासात उघड झाली. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार होता. दरम्यान, ४ जून रोजी आरोपी अहिल्यानगर शहरातून दौंड रोडमार्गे जाणार असल्याची गोपनीय माहिती शेवगाव पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी दौंड रोड परिसरात सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने चारचाकी वाहनातून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. आरोपीला ५ जून रोजी अटक करून त्याच दिवशी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक बाजीराव सानप, पोहेकॉ चंद्रकांत कुसारे, पोलीस कॉन्स्टेबल संपत खेडकर, श्याम गुजाळ, भगवान सानप, राहुल आठरे, ईश्वर बेरड, राजू बडे, सचिन पिरगळ तसेच नगर दक्षिण सायबर सेलचे नितीन शिंदे यांनी सहभाग घेतला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

दरम्यान, या आरोपीकडून अन्य कोणाचीही फसवणूक झाली असल्यास संबंधितांनी शेवगाव पोलीस ठाणे येथे संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात गुन्हेगारी वाढली...

### 'एसपीं'नी थेट एन्काऊंटर करावे : बाबुशेठ टायरवाले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस वाढत्या गुन्हेगारीवर शिवसेना नेते बाबुशेठ टायरवाले यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे . त्यांनी पोलीस प्रशासनाला थेट आव्हान दिले आहे. जिल्ह्यातील गुन्हेगारी संपविण्यासाठी जिल्हा पोलीस प्रमुख सुदर्शन यांनी किमान दोन-चार तरी एन्काऊंटर करा किंवा गुन्हेगारांच्या पायावर तरी गोळ्या घाला. तरच गुन्हेगारांवर वचक निर्माण होईल. गुन्हेगारांना कायद्याची भीती असणे गरजेचे आहे. या संदर्भात आपण राज्याचे गृहमंत्री व पालकमंत्री यांची भेट घेऊन त्यांनाही तसे निवेदन देणार असल्याचे बाबुशेठ टायरवाले यांनी स्पष्ट केले. माध्यमांशी बोलताना टायरवाले म्हणाले की, जिल्ह्यामध्ये कायद्याची आणि पोलिसांची भीती पूर्णपणे संपली आहे. नुकतीच राहुरी विद्यापीठाच्या आवारात ड्युटीवर असताना एका तरुण सुरक्षा रक्षकाची झालेली हत्या अत्यंत निषेधार्ह आहे. याशिवाय, जामखेडमध्ये काही महिन्यांपूर्वी एका पैलवानावर झालेला गोळीबार आणि अशा अनेक घटनांमुळे जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गुन्हेगारांना असे वाटते की, आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी काही दिवसांत जामिनावर बाहेर येऊ. पैशांच्या जोरावर न्यायालयीन प्रक्रियेतून सुटण्याची ही पद्धत थांबली पाहिजे. पोलिसांची संख्या कमी आहे, त्यामुळे प्रत्येक गुन्हेगाराच्या मागे पोलीस फिरू शकत नाहीत. यासाठी गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा वचक आणि कायद्याची भीती असणे गरजेचे आहे. उत्तर प्रदेशमध्ये ज्याप्रमाणे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या काळात गुन्हेगारांवर कडक कारवाई केली गेली, तशीच धडक कारवाई महाराष्ट्रातही होणे आवश्यक आहे.

मी यापूर्वीही राज्याच्या गृहमंत्र्यांना महाराष्ट्रात दोन-चार एन्काऊंटर करण्याचे आवाहन केले होते. आता पुन्हा एकदा मी जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांना (ड्झ) विनंती करतो की, त्यांनी केवळ कमरेला पिस्तूल लावून मिरवू नये. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी दोन-चार एन्काऊंटर करा, नाहीतर किमान गुन्हेगारांच्या पायावर तरी गोळ्या घाला.

## महाराष्ट्रात मुंडेचा अन्न भेसळी वर वार

### शिर्डीत कधी होणार 'तुकारामा'चा प्रहार

अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी त्यांनी आयुक्तपदाचा कार्यभार पदाचा पदभार स्वीकारताच संपुर्ण महाराष्ट्रात अन्न भेसळी वर जोरदार वार केला आहे. साई बाबाच्या शिर्डीत ही अन्न भेसळीची चर्चा असून मुंढे शिर्डीतील भेसळीवर कधी प्रहार करतात याची सर्व नागरीकांना मुंढे च्य दणक्याची प्रतिक्षा लागली आहे. शिर्डीत मोठ्या प्रमाणात अन्न भेसळ होत असल्याची प्रकरणे समोर येत असतात. परंतू थातूरमातूर कारवाई करून प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात विक्री होणारे पेढे प्रमुख लक्ष बनले आहे.

नुसत्या पेढाच नव्हे तर अनेक रेस्टारंटमधे वापरण्यात येणारे खाद्यतेल, पनीर व खाद्यपदार्थ बनवण्यासाठी वापरतात असलेले किरणा तील भेसळ होत असून येथील अन्न भेसळ प्रतिबंधक कानाडोळा करीत असल्याचे दिसून येत आहे. नगर जिल्ह्यातील दूध टॅकर चे टॅकर भरून परराज्यात जातात मुळात संकलन कमी अन पुरवठा जास्त अशी परिस्थिती आहे. शिर्डीत मागे लाखो रुपयांचा गुटखा शिर्डी पोलीसांनी पकडून अन्न व औषध प्रशासनाच्या ताब्यात दिला त्याचे पुढे काय झाले या ची खबर कुणालाही नाही . रेशन च्या तांदळात मागे प्लास्टीक ची भेसळ आढळली होती त्याचा ही काही सुगावा लागला नाही . शनि शिंगणापूर ला शनीवर चढवले जाणारे तेल भेसळ युक्त असल्याने ब्रॅंडेड तेल आता वापरात आहे मात्र ते जरी ब्रॅंड लाऊन विक्री केले जात असले तरी ते खरच शुद्ध आहे का हे पहाण्याच्या फंदात कुणी पडत नाही .

यात पाणी मागे नाही उन्हाळ्यात वॉटर प्युरी फायरचे थंड पाण्याचा मोठ्या प्रमाणात विक्री होत असते हे पाणी थंड करण्यासाठी केमीकलचा वापर केला जातो ही बाब पुढे आली होती. आज बाजारात मोठ्या प्रमाणात बाटली बदं पाणी मिनरल वॉटरच्या नावाखाली विकले जाते बाटली वर लिहीलेले गुणवता व प्रमाण तेवढे आहे का हे ही न उडगडणारे कोडे आहे. कोपरगाव तालुक्यात दक्षिण भारतातील निर्मीती असलेले लेबल लावून माती मिस्त्रित खते विक्री चे प्रकरण उघड झाले होते. जनावरांच्या खाद्याचा असाच प्रकार आहे. निघोज येथील एका डेअरी चालकाने पुणे येथील कंपनी कडून लाखो रुपयांचे पशुखाद्य खरेदी केले होते ते पशुखाद्य जनावरांनी खाल्ल्याने जनावरे आजारी पडले तसेच दूधात घट झाली याची तक्रार करून त्याचा काही उपयोग झाला नाही.

## ठराविक पक्षाच्या कार्यकर्त्यांप्रमाणे नव्हे, तर लोकसेवक म्हणून काम करा

### जनता दरबारात आ. आशुतोष काळेंचे अधिकाऱ्यांना खडे बोल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** तुम्हाला शासनाकडून मिळणारा पगार जनतेने दिलेल्या करातून केला जातो त्यामुळे ठराविक पक्षाच्याच नागरीकांची कामे करू नका. तुम्ही जनतेचे सेवक आहात,तुमच्याकडे जो आपली अडचण घेवून येईल, आपले काम घेवून येईल त्यांना मदत करून त्यांच्या अडचणी सोडवा. येणाऱ्या सर्व नागरीकांची कामे लवकरात लवकर कशी होतील याची काळजी घ्या, ठराविक पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करू नका,लोकसेवक म्हणून काम करा असे खडे बोल तहसील कार्यालयात घेतलेल्या पंचायत समितीच्या जनता दरबारात आमदार आशुतोष काळे यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.




सोमवार (दि.०८) रोजी पंचायत समितीच्या सर्व विभागातील अनेक नागरीकांची अडलेली कामे त्वरित मार्गी लावण्यासाठी सबंधित विभागाचे अधिकारी व नागरीकांना एकाचवेळी समोरासमोर घेवून नागरीकांच्या अडचणी आमदार आशुतोष काळे यांनी आपुलकीने जाणून घेत कामचुकार अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. या जनता दरबारात अनेक नागरिकांनी आपल्या अडचणी आणि प्रश्न आमदार आशुतोष काळे यांच्यापुढे मांडले. यावेळी त्यांनी शिक्षण,आरोग्य,पशु संवर्धन,घरकुल, बांधकाम विभाग,जल जीवन, मनरेगा, अशा विभागाच्या कामाचा आढावा घेवून उपस्थित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. काही ग्रामसेवकांबाबतच नागरीकांच्या वारंवार तक्रारी कशा येतात. यापुढे तक्रारी आल्या तर मी तुमची तक्रार केल्याशिवाय राहणार नाही असा सज्जड ईशारा कामचुकार ग्रामसेवकांना त्यांनी दिला.

घरकुल लाभार्थ्यांच्या जिओ टॅगिंग प्रक्रियेस विलंब होत असल्यामुळे लाभार्थ्यांना पुढील हप्त्याची रक्कम वेळेवर मिळत नाहीत.त्यासाठी प्रलंबित जिओ टॅगिंग तात्काळ पूर्ण करून लाभार्थ्यांना नियमानुसार हप्ते वितरित करून बांधकामात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची काळजी घ्या. पावसाळा सुरु झाला असून पावसाळ्यापूर्वी आरोग्य विभागाने डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो इत्यादी साथीचे आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष दक्षता घ्यावी. गावपातळीवर जनजागृती करण्याबरोबरच औषध फवारणी, स्वच्छता मोहीम व प्रतिबंधात्मक उपाय योजना राबवाव्यात. त्याचप्रमाणे पशुसंवर्धन विभागाने देखील पावसाळ्यात जनावरांना होणारे संभाव्य आजार टाळण्यासाठी जनावरांचे लसीकरण, आरोग्य तपासणी शिबिरे व उपचार सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.बांधकाम विभागाने सुरु असलेली अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करून घ्यावीत. सोमवार (दि.१५) पासून सर्व शाळा सुरु होत असून धोकादायक इमारतीचे निर्लेखन करून आवश्यक उपाय योजना करून जिल्हा परिषद शाळेतील पट संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न करा. अनेक पात्र महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे मिळत नाही अशा महिलांना योग्य व स्पष्ट माहिती द्या त्यांना कार्यालयात वारंवार फेऱ्या मारायला लावू नका आणि वेळ मारून नेण्यासाठी कोणत्याही प्रकारची उडवा उडवीची उत्तरे न देता योग्य मार्गदर्शन करा.

काही ग्रामसेवक त्यांना नेमून दिलेल्या गावात नियमित उपस्थित राहत नाही त्यांनी नेमून दिलेल्या दिवशी गावात उपस्थित राहावे. ज्या ग्रामसेवकांकडे दोन गावांचा कार्यभार आहे त्यांनी निश्चित वार व वेळापत्रक ठरवून ग्रामस्थांना माहिती द्यावी जेणेकरून नागरीकांना हेलपाटे मारावे लागणार नाहीत. ग्रामसेवकांनी नियमित हजर राहून नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करावीत.आंचलगाव ग्रामपंचायतीसाठी नेमणूक असलेले ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याबाबत अनेक ग्रामस्थांच्या तक्रारी असून संबंधित प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करावा अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी गटविकास अधिकारी व सबंधित सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी गटविकास अधिकारी संदीप दळवी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन प्रवीण शिंदे, कारभारी आगवण, कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, दिलीपराव बोरनारे, अनिल कदम,राहुल रोहमारे, प्रशांत घुले, डॉ.मच्छिंद्र बर्डे, श्रावण आसने, विष्णू शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, जिनिंग प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार,पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनराव काळे, मधुकर टेके, वाल्मीकराव कोळपे, संभाजीराव काळे, शिवाजीराव ठाकरे,प्रशांत वाबळे,बाजार समितीचे संचालक राजेंद्र निकोले,रामदास केकाण आदी मान्यवरांसह, पंचायत समितीच्या विविध विभागाचे अधिकारी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी तसेच विविध गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.